cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

www.epaper.rajyaloktantra.com | email:rajyaloktantra75@gmail.com




बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३१ | शुक्रवार, दि.०५ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सोनिया गांधींविरोधात याचिका दाखल

दिल्ली: काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्या विरोधात दिल्ली न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली असून, नागरिकत्व मिळण्याच्या तीन वर्षे आधीच त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट असल्याचा दावा याचिकेमध्ये करण्यात आला आहे. या प्रकरणात बोगसगिरीची शक्यता असल्याने पोलिसांकडून तपास करण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली असल्याचे समोर आले आहे. मंगळवार, ३ सप्टेंबर रोजी दाखल करण्यात आलेल्या याचिकेत म्हटले आहे की, सोनिया गांधी यांना ३० एप्रिल १९८३ रोजी भारतीय नागरिकत्व मिळाले. मात्र, त्यांचे नाव त्यापूर्वीच, म्हणजे १९८० मध्ये नवी दिल्ली मतदारसंघाच्या मतदार यादीत होते, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

### कॉ.पानसरे हत्या प्रकरणी राज्य सरकारला नोटीस

नवी दिल्ली : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासावर अधिक देखरेख ठेवणे आवश्यक नसल्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला नोटीस पाठविली असून राज्य सरकारकडे उत्तर मागितले आहे. या हत्येचा तपास सुरुवातीला पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) केला होता. परंतु, नंतर २०२२ मध्ये तो महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाकडे (एटीएस) सोपवण्यात आला. उच्च न्यायालय २०१६ पासून तपासावर देखरेख करत होते. तपास यंत्रणा नियमितपणे तथ्यात्मक स्थिती अहवाल सादर करत होत्या.

### राज्यातील सर्व तालुक्यात 'फार्मर कप' – मुख्यमंत्री

मुंबई: राज्यातील सर्व तालुके आणि गावांमध्ये राज्य शासन व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'फार्मर कप' या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी कृषी विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य शासनाची उच्चस्तरीय समिती व पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राज्यात २०२६–२७ या वर्षासाठी १५ हजार शेतकरी उत्पादक गट तयार करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, उत्पादित शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे. शेतीमध्ये उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध पातळीवर अनेक उपाययोजना करत आहे.


### बंगाल विधासभेत अभूतपूर्व राडा!

कोलकाता: पश्चिम बंगाल विधानसभेत गुरुवारी नाट्यमय घडामोडीनंतर सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि विरोधी भाजप आमदारांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली. यानंतर विधानसभेत अभूतपूर्व राडा झाल्याने कामकाज स्थगित करण्यात आले. या गोंधळानंतर भाजपच्या पाच आमदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. बंगाली स्थलांतरितांवर होणाऱ्या अत्याचारांबाबत सत्ताधारी पक्षाने आणलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरू होती.

# ई–पीक पाहणी करावीच लागणार नसेल तर हमीभावाने विक्री अशक्य!

**पुणे । प्रतिनिधी**

**देशभरातील बाजारपेठेत कापूस, सोयाबीन आणि तुरीचे भाव दबावाखाली आहेत. शेतकऱ्यांना खुले बाजारभाव फायदेशीर ठरत नसल्याने त्यांची मोठी भिस्त हमीभावावर असते. मात्र हमीभावाने विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंद असणे आवश्यक आहे. यासाठी ई–पीक पाहणी अनिवार्य करण्यात आली असून, कृषी विभागाने यासंदर्भातील तांत्रिक अडचणी सोडवून प्रक्रिया सुलभ केली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ई –पीक पाहणी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.**



**ई–पीक पाहणी फायद्याचीच**

कापूस, सोयाबीन, तूर यांसारख्या मुख्य पिकांचे दर हमीभावाखाली गेल्याने शेतकऱ्यांसाठी ही पाहणी अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. ई-पीक पाहणी केल्यास शेतकरी केवळ हमीभावाने विक्रीच करू शकणार नाहीत, तर भविष्यातील शासकीय योजना, विमा व नैसर्गिक आपत्तीमधील भरपाईसाठीही पात्र ठरतील.

या वर्षी सरकारने मध्यम लांब धाग्याच्या कापसाला प्रतिक्विंटल ७,७१० आणि लांब धाग्याच्या कापसाला ८,११० हमीभाव जाहीर केला आहे. मात्र खुल्या बाजारात कापसाचे दर हमीभावापर्यंत पोहोचण्याची शक्यता कमी आहे. केंद्र सरकारने कापूस आयातीवरील ११% शुल्क ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत रद्द केल्यामुळे आयात वाढेल आणि दर दबावाखाली राहतील. सोयाबीनसाठी सरकारने हमीभाव ५,३२८ ठेवला आहे, पण बाजारात सध्या ४,३०० ते ४,६०० मध्येच सोयाबीन विक्री होत आहे. आवक वाढल्यानंतर दर आणखी घसरण्याची भीती आहे. ▶▶ पान २ वर

# मनोज जरांगे यांच्या नव्या मागणीने सरकारची कोंडी

**छ.संभाजीनगर। प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर या पार्श्वभूमीवर आज मनोज जरांगे पाटील यांनी नवी मागणी करत सरकारची कोंडी केली आहे.ओबीसी साठी उपसमिती त्यात मायक्रो ओबीसींना लाभ होत नाही शेतकरी मुस्लिम यांच्यासाठी देखील उपसमिती स्थापन करावी अशी मागणी केली आहे.



''सरकार म्हणजे राज्यातील साडेचौदा कोटी जनतेचे मालक आहेत. तुम्ही ओबीसींसाठी उपसमिती स्थापन केली आहे तर आता आणखी एक काम करा. राज्यातील दलित आणि मुस्लीम समाजासाठीही उपसमिती स्थापन करा. एक उपसमिती शेतकऱ्यांसाठी स्थापन करा आणि मायक्रो ओबीसींसाठी एक वेगळी उपसमिती स्थापन करा,'' अशी मागणी मनोज जरांगेंनी केली आहे. तसंच ओबीसींसाठी जी उपसमिती स्थापन करण्यात आली तिचा मायक्रो ओबीसींना ▶▶ पान २ वर

# ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही– मंत्री पंकजा मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यश आले आहे. मराठा समितीने हैदराबाद गॅझेट मान्य असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार गावातील, नात्यातील, कुळातील लोकांना चौकशी करुन कुणबी प्रमाणपत्र देणार असल्याचे समितीने मान्य केले आहे. यावर राज्याच्या पर्यटनमंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आर्थिक मागासलेपण हा वेगळा विषय आहे आणि सामाजिक मागासलेपण हा वेगळा विषय आहे. मला हे आधीही वाटत आले आहे आणि पुढे ही तेच वाटत राहील त्यात बदल होणार नाही असे मुंडे म्हणाल्या.



मराठा समाजासाठी जीआर काढला तर ओबीसीवर अन्याय होऊ नये यासाठी समितीही काढली आहे असें पंकजा मुंडे म्हणाल्या. राज्य सरकारकडून यावर सुवर्णमध्य काढला जाईल ही प्रार्थना केली आहे. सगळे समाज आनंदात नांदावे ही इच्छा व्यक्त केल्याचे मुंडे म्हणाल्या. सामाजिक मागासलेपण असलेल्या ▶▶ पान २ वर

## बनावट नोटा प्रकरणी दोघे आरोपी पकडले

**बीड । प्रतिनिधी**

दि.३० ऑगस्ट रोजी बाजीराव कॉम्पलेक्स, स्वराज्य नगर, बीड येथील बँकेचे मशिन मध्ये बनावट नोटा टाकतांना सीसीटीव्ही मध्ये दिसून आल्यानंतर या गुन्ह्यातील दोघांना शिवाजीनगर पोलिसांनी आटक केली.

सदर गुन्ह्याची गार्भीयाने दखल घेवुन आरोपी शोधकामी तात्काळ पथक तयार करुन रवाना केले होते. त्यावेळी नमुद पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर बँकेचे / मशीन चे फुटेज चेक करुन त्याअधारे आरोपी निष्पन्न करुन निष्पन्न आरोपीचा गोपनीय ▶▶ पान २ वर

# ओबीसींच्या १४ पैकी १२ मागण्या मान्य

**राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे उपोषण मागे**

**नागपूर । प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात येऊ नये यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाची गुरुवारी सांगता झाली. राज्य सरकारतर्फे ओबीसी खात्याचे मंत्री अतुल सावे यांनी संविधान चौकात आंदोलन स्थळी भेट देऊन महासंघाच्या १४ पैकी १२ मागण्या तात्काळ मान्य केल्यानंतर संघटनेने आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले. यावेळी राष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष यांनी पाणीघेऊन साखळी उपोषणाची सांगता झाली.



मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आंदोलन मागे घेतल्यानंतरही राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण सुरूच होते. सरकारच्या प्रतिनिधींनी भेट दिल्याशिवाय आंदोलन ▶▶ पान २ वर

## मुंडे समर्थक नारायण शिंदेंवर बलात्काराचा गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

**माजीमंत्री धनंजय मुंडे यांचे समर्थक आणि नेकनूर गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण शिंदे यांनी एका पंडित महिलेस आपण लवकर च लग्न करू तुला घर घेऊन देतो असे म्हणत तिची आर्थिक फसवणूक करतानाच तिच्यावर वेळोवेळी अत्याचार केल्या प्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, शिंदे याने २००६ पासून ते २०२२ पर्यंत लग्नाचं आमिष दाखवून वारंवार बलात्कार केला. याचबरोबर 'घर घेऊन देतो', म्हणत तब्बल १ कोटी १० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केली महिला शिक्षिकेनं या त्रासाला कंटाळून पोलिस ठाण्यात तक्रारीवरुन नारायण शिंदे याच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कलम ३७६, ३७६ (२) (एन), ४०६, ५०६ कलमाप्रमाणे ▶▶ पान २ वर

## जरांगेंसह मराठा समाजाचीही फसवणूक–प्रकाश आंबेडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

सरकारच्या या जीआरमध्ये वेगळे काहीही नाही. सरकारने जरांगे यांच्यासह मराठा समाजाची फसवणूक केलेली आहे, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केला. यासंदर्भात त्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयाचा दाखला दिल्याने खळबळ उडाली आहे.



मराठवाड्यातील मराठा समाजातील व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या गॅझेटमधील नोंदीनुसार आता स्थानिक पातळीवर एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीद्वारे अर्जदार मराठा व्यक्ती कुणबी असल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे की नाही? हे ठरवले जाईल. दरम्यान, प्रकाश ▶▶ पान २ वर

# पनीर, दूधसह अनेक वस्तू स्वस्त

**जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

नवी दिल्लीत जीएसटी कौन्सिलची ५६ वी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ५ टक्के आणि १८ टक्के जीएसटी दरप्रणालीला मंजूरी देण्यात आली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी याबाबत माहिती दिली. जीएसटी परिषदेच्या या निर्णयामुळे देशभरातील सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्यपदार्थ, साबण, कपडे, पादत्राणे यासह रोजच्या वापराच्या गोष्टी स्वस्त होणार आहेत. तर आरोग्य विमा आणि जीवन विम्यात पूर्ण सूट मिळण्याची शक्यता आहेत. सरकारचा हा निर्णय नवरात्रीच्या पहिल्या दिवशी म्हणजे २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे. जीएसटी परिषदेने मात्र सोन्यावरील जीएसटी दर बदललेला नाही.सोने आणि चांदीवरील ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ सप्टेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७७.५० क्विंटल | २,५०१ | २,७२० | २,६०६ |
| ज्वारी/हायब्रिड :५१.५० क्विंटल | २,००० | ३,०६१ | २,४२४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : २०.०० क्विंटल | ५,४०० | ६,१०१ | ५,८५० |
| उडीद : १५.०० क्विंटल | ४,६०० | ५,३०० | ४,८८८ |
| बाजरी: ५६.०० क्विंटल | १,७०० | २,८९८ | २,५५० |
| मुग: २६.५० क्विंटल | ८,४०० | ८,४०० | ६,२६३ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ४,६५१ | ५,७७० | ५,३७० |




# देवबाप्पा, तीन वर्षे झाली बाशिंग बाधून तयार पण मुहूर्त सापडेना

**राज्य लोकतंत्र**

**भाग आठवा । सुभाष चौरे**

बीड–पुणे : राज्यातील महानगरपालिका नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका गेल्या तीन वर्षापासून रखडलेल्या आहेत, इकडे भावी जिप., नप. सदस्य गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत. मात्र सरकार त्याचा मुहूर्त काढत नसल्याने काय करावे हे त्यांनाही कळत नाही. दुसरीकडे मात्र सर्वसामान्यांनी कोणाकडे दाद मागायचे असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. केवळ शहरच नाही तर ग्रामीण भागात देखील असाच प्रश्न आहे. गेल्या तीन वर्षापासून प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये अधिकारी राज सुरू असल्याने हम करे सो कायदा अशी परिस्थिती राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये निर्माण झाली आहे. देवबाप्पा, याला मुहूर्त कधी लागणार हे आता तुम्हालाच विचारावे लागणार आहे. स्थानिक राजकारणाला बळकटी मिळावी, स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत हव्यात यासाठी राज्यात पंचायत राज समिती स्थापन झाल्यानंतर प्रत्येक घटकाला ▶▶ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# स्वदेशीचा मंत्र उभारी देणारा !

कोणतीही महासत्ता असो किंवा पाकचे दहशतवादी हल्ले अथवा ट्रम्पचे टेरिफ युद्ध भारत झुकणार नाही, आत्मनिर्भर भारत हा बाणा कायम राखत जगातली तिसरी अर्थव्यवस्था होणेपासून भारताला कोणी मागे सरकवू शकत नाही. हाच विश्वास सद्या व्यक्त होताना दिसत आहे. भारत जगातली तिसरी अर्थव्यवस्था म्हणून पावले टाकत आहे. कुणी धमकावले, टेरिफ युद्ध सुरु केले किंवा भारताला खाली खेचायचा प्रयत्न केला तर त्यांची जागा दाखवायची धमक भारतात आहे.

भारत हा जगातील सर्वाधिक तरुण देश आहे. भारताची विविधता आणि आत्मनिर्भरता भारताला अशा एका उच्चस्थानी घेऊन गेली आहे की, त्यामुळे जगभरच्या जुलमी सत्तांना धडकीच भरावी. अमेरिका फस्ट म्हणत ट्रम्पतात्यांनी भारताशी पंगा घेतला आहे. ट्रम्पचे सल्लागार भारताला चिरडून टाकू वगैरे दर्पोक्ती करत आहेत पण भारताने फारशी बडबड वा तडजोड न करता भारत भारत आहे हे दाखवून दिले आहे. भारताने एकूण जागतिक व्यापारात अमेरिकेला गृहीत न धरता पावले टाकायची आणि व्यापार उद्दिष्ट पूर्ण करायचे असा निर्धार केलेला दिसतो आहे. जीएसटी संकलनाची आकडेवारी, सकल राष्ट्रीय उत्पन्न दर जगभरातून भारताला आणि भारत सरकारच्या भूमिकेला मिळत असलेला पाठिंबा पाहता भारत करुन दाखवणार हे आता सर्वांना कळून चुकले आहे. आकडेवारी पण तेच सत्य अधोरेखित करत आहे. सेमीकंडक्टर निर्मिती असो वा देशांतर्गत मागणी, व्यापार यांना प्रोत्साहन देण्यासाठी जीएसटी स्लॅब रचनेत बदल करुन मागणी वाढवण्यासाठी केलेल्या उपाययोजना असोत ट्रम्प तात्याची बोबडी वळेल अशा त्या आहेत. १५ ऑगस्टला पंतप्रधानांनी यंदाचा दसरा, दिवाळी स्वस्त मस्त होईल, सरकार जीएसटी स्लॅब कमी करेल, कर कमी होतील व अनेक जीवनावश्यक गोष्टी स्वस्त होतील असे म्हटले व स्वदेशीचा मंत्र सांगितला. पावलेही तशी पडत आहेत आणि भारतीय नागरिकांनी देशभक्ती या एका मुद्यावर फक्त मेड इन इंडिया स्वदेशी वस्तू खरेदी केल्या की सारे सूतासारखे सरळ येतील. दोन दिवसांपूर्वी जीएसटी संकलनाची जी आकडेवारी आली आहे, ती उत्तम आहेच. सरकारी आकडेवारीनुसार, वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) संकलन गेल्या पाच वर्षांत दुप्पट झाले असून, २०२४-२५ या आर्थिक वर्षात ते विक्रमी २२.०८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. २०२०-२१ या आर्थिक वर्षात हे संकलन ११.३७ लाख कोटी रुपये होते. २०२४-२५ मधील जीएसटी संकलन मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ९.४ टक्के अधिक आहे. २०२५ आर्थिक वर्षात सरासरी मासिक संकलन १.८४ लाख कोटी रुपये होते, तर २०२४ मध्ये १.६८ लाख कोटी रुपये आणि २०२२ मध्ये १.५१ लाख कोटी रुपये होते. केंद्र आणि राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा समावेश असलेल्या 'जीएसटी' परिषदेने कर अनुपालन सुलभ करावे, कराचे स्तर तीनपर्यंत कमी करावेत आणि पेट्रोलियम उत्पादनांना जीएसटीखाली आणून त्याचा आवाका वाढवावा, असे 'पीडब्ल्यूसी इंडिया'च्या सोमवारी प्रसिद्ध झालेल्या अहवालात म्हटले आहे. गेल्या आठ वर्षांत, सरासरी मासिक जीएसटी संकलन २०१७-१८ मधील ९०,००० कोटी रुपयांवरून २०२४-२५ (एप्रिल-मार्च) मध्ये १.८४ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. एप्रिल २०२५ मध्ये संकलनाने २.३७ लाख कोटी रुपयांचा विक्रमी उच्चांक गाठला. सध्या, जीएसटीची ५, १२, १८ आणि २८ टक्के अशी चारस्तरीय कररचना आहे. चैनीच्या आणि हानिकारक वस्तूंवर २८ टक्के सर्वोच्च दराने जीएसटी आकारला जातो. पॅकबंद अन्न आणि आवश्यक वस्तूंवर पाच टक्के 'जीएसटी' आकारला जातो. सध्याच्या चारस्तरीय 'जीएसटी' ऐवजी तीन स्तरांत 'जीएसटी' आकारला गेल्यास विवाद कमी होतील, कराची निश्चितता सुधारेल आणि अनुपालन सोपे होईल, असा दावा करण्यात आला आहे. भारत-चीन-रशिया ही शक्तीशाली आघाडी तयार होण्याचा धोका अमेरिका पत्करत आहे, असा इशारा ट्रम्प यांना मिळाला आहे. ''चिनी, रशियन आणि भारतीय हे जर कोणत्याही स्वरूपातील आर्थिक आणि काही प्रमाणात लष्करी आघाडीत एकत्र आले, तर अमेरिकन लोकांना २१ व्या शतकात स्पर्धा करणे शक्यच होणार नाही, असे विश्लेषण पुढे आले आहे, जे संबंध भारतीयांसाठी भूषणावह असेच आहे.

# मराठा आरक्षणाची जबाबदारी राज्याची की केंद्राची?

## राज्य शासनाला अधिकार आहे तर कोर्टात कशासाठी गेले ; राजकीय पक्ष आणी नेत्यांकडून मराठा समाजाची दिशाभूल तर नाही ना...?

**आता एकच पर्याय आहे तो म्हणजे कायदेशीर व घटनात्मक तरतुदी असलेल्या कायदेशीर बाबी अभ्यासने व त्यावर शासनास निर्णय घेण्यास भाग पाडणे तरच हाती काही लागेल अन्यथा राज्य शासनास जर मराठा आरक्षण देण्याचे अधिकार आहेत तर राज्य शासन सर्वोच्च न्यायालयात कशासाठी गेले ? म्हणुन आता मराठा आरक्षणाची जबाबदारी राज्य शासनाची आहे की केंद्र शासनाची आहे हे सांगुन आरक्षणाची सत्यता मराठा समाजासमोर आणण्याची गरज आहे,**

खरे तर पुनर्विचार याचीका सारखीच स्थिती क्यूरेटिव्ह पिटीशनची झालेली असल्यामूळे आरक्षणाची सध्य स्थितीत आरक्षण स्थिती स्पष्ट करने गरजेची आहे. मराठा समाजाकडून तशी मागणी होणेही गरजेचे आहे. मराठा आक्षणाचा मुद्दा सध्या कायदेशीर आणि घटनात्मक दृष्ट्या न्याय प्रविष्ट आहे, राज्य शासनाला सध्या आरक्षण देण्याचा अधिकार नसल्यामुळेच सर्वोच्च न्यायालयात क्युरेटिव्ह पिटीशन दाखल केलेली आहे आणि म्हणुन न्यायालया बाहेर काहीच तडजोड करता येणार नाही आणि तसे केल्यास तसे कृत्य सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरू शकतो. म्हणुन आता केंद्र शासनाने त्यांच्या अधिकाराचा वापर करुन आरक्षणाची मर्यादा वाढविण्याची सुदर्शन नच्चीपन्न समितीची शिफारस असलेले बील स्वीकारून घटना दुरुस्ती करुन आरक्षण द्यावे. आता अनेक बाबी समाज म्हणून समजाऊन सांगाव्या लागणार आहेत. इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार या आरक्षणा च्या केसचा निकाल नऊ न्यायधीशांच्या घटनापीठाने दिला होता हे जग जाहीर आहे तरी पण मराठा आरक्षण विषय पाच न्यायधीशांच्या घटनापीठाकडे पाठवला. यामुळेच मराठा समाजाचा घात झाला आहे त्यावर मराठा म्हणून सगळे विचार करणार आहे की नाही? वविध केस, विविध घटना पीठाचे निकाल यांचे अत्यंत अभ्यासू संकलन राज्य शासनाच्या मंत्रीमंडळ उपसमिती व कायदा विभागासाठी तयार केले गेले होते व हे संकलन शासनाने प्रत्यक्ष पहावे आणि त्याचा समावेश पुनर्विचार याचीकेतील असलेल्या त्रुटी दुर करण्यासाठी करावा आणि याचे सादरीकरण करण्यासाठी तारीख वेळ निश्चित करावा असे लेखी मागणी पत्र जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांच्यासह काही अभ्यासू मंडळींनीच्या वतीने शासनास सादर केल्या गेले होते. पण...शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे शासनास अपुऱ्या माहिती आधारे असलेल्या पुनर्विचार याचीकेवर मराठा समाजाच्या बाजूने कौल मिळविता आला नाही व ही संधी हातातुन गेली. आता अंतीम संधी म्हणून क्यूरेटिव्ह पिटीशन चा पर्याय शिल्लक आहे. त्या बाबत सुद्धा पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन (पीपीटी) व्दारे क्यूरेटिव्ह पिटीशन मध्ये सामाविष्ट करावयाचे केस लॉ- विविध घटना पीठाचे न्याय निवाडे याचे सादरीकरण करण्यासाठी बैठक घ्यावी, असे लेखी पत्रही राजेंद्र दाते आणि काही कायदेशीर अभ्यासू मान्यवरांच्या वतीने शासनास दिनांक ०७ मे २०२३ रोजीच दिलेले आहे, परंतु शासनाकडून अद्याप काही एक हालचाल दिसुन येत नाही. क्यूरेटिव्ह पिटीशनचा शेवटचा पर्याय शिल्लक आहे. आणि शासनाने अशीच भुमिका ठेवली तर मात्र गंभीर स्थिती निर्माण होणार आहे व कदाचीत पिटीशन चा निकाल मराठा समाजाच्या विरोधात जाईल. नव्हे याही केसचे पुनर्विचार याचिका सारखेच निकाल अपेक्षित आहेत आणि ही बाब जर मराठा समाजाच्या बाजूने नाही आली तर मात्र २०२१ सालच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी राज्य शासनास करावी लागणार आहे. खरे तर तेच कायदेशीर पाऊल ठरणार आहे म्हणुनच मुख्यमंत्र्यांनी याचा सुतोवाच सभागृहात केलेले आहे. दुसरे अंत्यन्त महत्वाचे असे की राजकीय पक्षांची भुमिका ज्यात काँगेस, भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना सगळ्यांची भुमिका स्पष्ट आहे आणि ती म्हणजे कोणाच्याही आरक्षणाला धक्का लावणार नाही. मग आता सांगा धक्का न लावता कोणते आरक्षण दिल्या जाऊ शकते ? एकही राजकीय पक्ष मराठा समाजाच्या बाजूने नसताना विधानसभेत आरक्षण दिल्याचा व तसा ठराव कायदा कसा मंजुर होईल ? हा ठराव-कायदा मंजुर करायला बहुमत आपल्या बाजूने कसे आणायचे ? यावर तर खरे पाहता मंथन- चर्चा होउन घटनात्मक व कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्या शिवाय मार्गच निघू शकणार नाही आणि हे सगळ्यांना माहीत असताना या सर्व बाबी मराठा समाजासमोर का आणल्या जात नाही? याचे काय कारण असेल ? या सर्व बाबी पुढे न आणण्या मागे काय कारण असेल ? हा शोध घेणे गरजेचे आहे.

मराठा आरक्षणाचा २०२१ चा मुळ निकाल काय म्हणतो हे आता समजुन घेणे महत्वाचे ठरणारे असुन सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाने स्पष्ट केले आहे की,मराठा समाजास मगासपणा नव्याने सिद्ध करावे लागेल आणि त्यासाठी आयोगाची स्थापना झाल्या शिवाय आणि त्यांचा अहवाल विधिमंडळात मंजुरी शिवाय कायदा होणार नाही. म्हणून वेगळा पर्याय आहे काय? यावर विचार विनिमय होऊन इंद्रा सहानी प्रकरणातील पन्नास टक्के आरक्षण मर्यादा विषय सतत अडसर ठरणार आहे म्हणून केंद्र शासनाने घटना दुरूस्ती व्दारे आरक्षण मर्यादा वाढविणे हाच अंतीम पर्याय असुन भाजपा आणि मुख्यमंत्री फडणवीस आणी सर्वच राजकीय पक्षांना केंद्र शासनानाकडे पाठपुरावा करावा लागणार असुन हे केले तर देश भरातील आरक्षणाचा प्रश्न चुटकसरशी सुटू शकतो.

**नारायण जाधव पाटील**
छत्रपती संभाजीनगर
मो.९६६५९४००९४

## पान ६ वरून...

### ईद ए मिलादून्नबीची मिरवणूक

सिरत कमिटीच्या वतीने घेण्यात आला. याशिवाय ईद ए मिलाद निमित्त निघणारी शांतता रलीचे दि.७ रविवार रोजी आयोजन करण्यात आले आहे. सलग तिसऱ्या वर्षी ईद ए मिलाद गणेश उत्सव काळात येत असून पैगंबर (स) जयंती गणेश विसर्जनानंतर ईद साजरी करण्याचा स्तुत्य निर्णय यावर्षीही सिरत कमिटीने घेतला आहे. आज दि.४ रोजी सहाय्यक पोलिस निरिक्षक देविदास वाघमोडे यांनी प्रतिष्ठीत नागरिकांची बैठक घेवून निर्णयाचे स्वागत केले. या बैठकीत सहाय्यक पोलिस निरिक्षक डि.बी. वाघमोडे, धारुर नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष आवेज कुरेशी, माजी नगरसेवक सय्यद हारुण , ईद ए मिलाद कमिटीचे अध्यक्ष माजी नगरसेवक शेख बाबुभाई मिस्त्री, ज्येष्ठ पत्रकार सय्यद शाकेर, पत्रकार दिनेश कापसे, शेख शाहेद, शेख वसिम गुत्तेदार, शेख मुबीन व शेख सिद्दीक उपस्थित होते.

-----------

### डॉ. शोएब हाश्मी यांचा

आदी ठिकाणी किराणा किट व अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपली. समर्थनगर येथील मुक्तिसोपान वृद्धाश्रम, एड्सग्रस्त बालक आश्रम शिवशंकर कॉलनी, संत भगवानबाबा बालिकाश्रम बीड बायपास, पडेगाव अनाथाश्रम, सिडको येथील अंध व अपंग मुलींचे वसतिगृह आदी ठिकाणी किराणा कीट, अन्नदान वाटप केले. याप्रसंगी शिवसैनिक, युवासैनिक आणि महिला आघाडी व अभिष्टचिंतन सोहळा समिती व मित्रपरिवार उपस्थित होते.

-----------

### विद्यार्थ्यांनीचे निवडले

पेंडगाव येथील जी प शाळेचे एन.एल. धोंडगे, नवगण राजुरी येथील गजानन विद्यालयाच्या सविता दिवे यांना रोटरी क्लब राष्ट्रशिल्पकार(नेशन बिल्डर) पुरस्कार देऊन गौरव करणार आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रोजेक्ट चेअरमन अविष्कार कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. सुनील खंडांगळे, जोशीज मॅथचे प्रा. सुनील जोशी, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो विकास उमापूरकर, सचिव रो सुमित जैस्वाल आदींनी केले आहे.

-----------

### महासांगवी तलावाला

तळ्याच्या भिंतीवर झाली असून तळ्याचे भिंतीवर झाडाचे जंगलाचे स्वरूप झले आहे. या झाडामुळे भिंतीला तडे जाऊन पाणी गळती होऊ शकते तसेच स्थळे हे फुटू शकते याकडे लघुपाठ बंधारे विभागाचे दुर्लक्ष असून. यावर तात्काळ उपायोजना कराव्यात अन्यथा तळे फुटून पाणी वाया जाऊ शकते व धोका निर्माण होऊ शकतो महासांगवी तलावावर पाटोदा शहराची आणी महासांगवी व कवडवाडी या गावाची पाण्याची उपजीविका भागते. तसेच हा प्रकल्प पाटोदा तालुक्यातील सर्वात मोठा आहे सध्या परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असतो यावर्षी पाटोदा तालुक्यात भरपूर पाऊस झाला असून सर्व तळे फुल झालेली आहेत महासांगवीच्या तलाव सांडवेहून पाणी पडले असून. तलावाच्या भिंतीवर मोठी मोठी झाडे. तळ्याच्या भिंतीवर झाली असून तळ्याचे भिंतीवर झाडे जंगलाचे स्वरूप बदले आहे. या झाडामुळे भिंतीला तडे जाऊन पाणी गळती होऊ शकते तसेच तलाव हा फुटू शकतो तलावाच्या पायथ्याला महासांगवी गाव व पाटोदा शहर आहे. तलावाची भिंत फुटल्यास खुप मोठी दुर्घटना होऊ शकते याकडे लघुपाठ बंधारे विभागाचे दुर्लक्ष असून. यावर तात्काळ उपायोजना कराव्यात अन्यथा हा प्रकल्प फुटुन लोखो लीटर पाणी वाया जाऊ शकते व खुप मोठी जिवीत हानी आणि खुप मोठी दुर्घटना निर्माण निर्माण होऊ शकते तरी लघुपट बंधारे या कार्यालयानी तात्काळ दखल घेऊन लवकरात लवकर त्या झाडांची विल्हेवाट लावावी

--------------

# गुरुमाऊलींना त्रिवार वंदन

**आपल्या जीवनाला योग्य दिशा देऊन आपल्या आयुष्याला सुलभ वळण देणारे फक्त दोनच गुरु आहेत.**

पाहिले आई वडील आणि दुसरे शिक्षक. आपल्या जिवनात संस्कार ,ज्ञान, आदरभाव आणि जीवनामध्ये जो आनंद आहे तो केवळ गुरु मुळेच बालपणी आई वडील आपल्या मुलांना पहिल्या दिवशी शाळेत घेऊन जातात. शाळेत त्याला शिक्षकाच्या स्वाधीन करून घरी परत जातात.त्यावेळ ते बालक घाबरून गेलेले असते,आजूबाजूला कोणीही परिचयाचे नसते, तेव्हा त्या घाबरलेल्या बाळाला जवळ घेऊन त्याची मनातील भीती दूर करून त्याला प्रेम,माया,व शिक्षणाची आवड निर्माण करतात. मुलांना संस्कार व ज्ञान देण्याचे कार्य करतात, विद्यार्थ्यांची आई बनून त्यांना आनंत कष्ट सहन करावे लागतात म्हणूनच त्यांना गुरुमाऊली असे म्हणतात.

आपल्या जीवनातील अंधकार दूर करून यशाचे मार्ग दाखवणारे आणि आपल्या जीवनात आनंदाची बाग फुलवून तिला सुजलाम सुफलाम करणारे फक्त आणि फक्त आपले गुरु असतात. आपणास भेटणारे गुरुजी हे समुद्रा सारखे असतात. समुद्र ज्याप्रमाणे अथांग असतो त्याचप्रमाणे गुरुचे ज्ञान हे अथांग असतं. गुरुच्या सानिध्या मुळेच आपणास समाजामध्ये उंच माथ्याने फिरून आदर्श प्राप्त होतो .तर गुरु हे ज्ञानाचे व आदर्शाचे खांब आहेत.

आपल्या जीवनातील अपूर्ण गोष्टी पूर्ण करण्यासाठी आपले गुरु ,शिक्षक हेच आपणास सर्व सहकार्य करतात व आपल्या मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना कसे दूर करायचे याच सखोल मार्गदर्शन करतात .आपले शिक्षक आपले सर्व अज्ञान दूर करण्याचे कार्य करतात. शिक्षकामुळेच विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये तत्व ,मूल्य व सकारात्मक विचाराची पेरणी होते. गुरु हे सतत आपल्या शिष्यांच्या हिताचे विचार करत असतात.

आपल्या जीवनामध्ये फुललेली आनंदाची बाग आपल्या गुरुच्या व आई-वडिलांच्या आशीर्वादानेच बहरलेली असते. सुरुवातीला अगदी पहिलीच्या वर्गापासून आपल्यासाठी घेतलेली मेहनत,त्रास ,कष्ट ही गोष्ट आपण कधीही विसरली नाही पाहिजे .गुरु भेटले की ज्ञान मिळते आणि ज्ञान मिळाले की अनुभव येतोश्री संत श्रेष्ठ संजीवन समाधीस्थ ज्ञानोबाराय म्हणतात...

गुरु विना अनुभव कैसा काळे प्रत्येकाच्या जीवनात ज्ञानाच्या समईची वात सतत तेवत ठेवणारे आपले शिक्षक आहेत. आजच्या शिक्षक दिनी माझ्या जीवनात भेटलेल्या समस्त गुरुजनांना माझा मानाचा मुजरा व त्रिवार वंदन...



• महादेव (नाना) साळुंके •
संत सदन ,कवडगाव
९९६०३७२७२४

## पान १ वरून...

### ई-पीक पाहणी करावीच लागणार

तुरीचे भावही स्थिर नसल्याने शेतकऱ्यांनी हमीभावावरच विक्रीचा पर्याय निवडावा, असा तज्ज्ञांचा सल्ला आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी करताना अनेक तांत्रिक अडचणी मांडल्या होत्या. त्या अडचणी सोडवून गेल्या आठवड्यात पाहणी प्रक्रियेला गती मिळाली आहे. अद्याप ई-पीक पाहणी न केलेल्या शेतकऱ्यांनी लवकरात लवकर ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन राज्य समन्वयक (ई-पीक पाहणी प्रकल्प) सरिता नरके यांनी केले आहे.

--------

### ओबीसी समाजावर अन्याय होऊ

ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही अशी भूमिका सरकार घेईल असा विश्वास आहे. जीआरमुळे ओबीसी वर अन्याय होणार असे वाटत असेल तर दोन महिने वेळ आहे. आम्ही तपासून पाहू असेही पंकडा मुंडे म्हणाल्या. ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही हा शब्द आमचा ओबीसींना असल्याचेही मुंडे म्हणाल्या. ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही अशी पावले उचलली जात आहेत.हैदराबाद गॅझेटियर लागू झाल्यानंतर त्याचा फायदा हा मराठवाड्यातील बहुतांश मराठ्यांना मिळणार असल्याचे बोलले जात आहे. कारण या आधीच ५८ लाख नोंदी सापडल्या असून त्या आधारे अनेकांना कुणबी सर्टिफिकेट मिळणार आहे. तसेच सरसकट मराठ्यांना कुणबी सर्टिफिकेट द्या ही जरांगेंची मागणी जरी सरकारने मान्य केली नसली तरी ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांच्या नात्यातील सर्वांनाच कुणबी सर्टिफिकेट मिळणार आहे.

-------------

### मनोज जरांगे यांच्या नव्या

काहीच फायदा होणार नाही, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ''ओबीसी समाजासाठी उपसमिती गठीत करण्यात आली असेल तर आमची काही नाराजी नाही, विरोध नाही. गोरगरीब ओबीसींचे प्रश्न सोडवण्यासाठी हे करण्यात आले असेल तर आमची काही हरकत नाही. पण मी माझ्या समाजास आरक्षण मिळवून देण्यास सक्षम आहे. कितीही उपसमित्या स्थापन केल्या, माझ्या अंगावर सोडल्या, राजकारणी लोकांचं ऐकून आमच्यावर टीका केली तरी मी मराठ्यांना आरक्षण मिळवून देतोय, याची समाजाला खात्री आहे. मराठ्यांना ओबीसीत मीच घालणार आणि मराठवाड्यातील मराठ्यांना आरक्षण मीच देणार. त्यामुळे कोणीही काहीही बोललं तरी फरक पडणार नाही.

----------

### मुंडे समर्थक नारायण

गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला असल्याचं सांगण्यात येत आहे. आरोपी नारायण शिंदे हा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा सक्रिय कार्यकर्ता म्हणून त्याची ओळख आहे. विशेष म्हणजे माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून समजले जातात या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

--------------

### ओबीसींच्या १४ पैकी १२

मागे न घेण्याच्या महासंघाच्या भूमिकेनंतर गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिनिधी म्हणून अतुल सावे यांनी सकाळी साखळी उपोषण स्थळाला भेट दिली. हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नसल्याचे आश्वासन सावे यांनी यावेळी दिले.मंत्री अतुल सावे यांनी ओबीसी महासंघाच्या मागण्यांसंदर्भात सरकारकडील सविस्तर निवेदन सादर केले. त्यानंतर ओबीसी महासंघाचे प्रमुख बबनराव तायवाडे यांनी साखळी उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. यावेळी ओबीसी आंदोलकांना त्यांच्या मागण्यांवर सरकारच्या वतीने अभिप्राय देण्यात आला आहे. यात विविध मागण्यांवर सविस्तर माहिती सरकारच्या वतीने देण्यात आली आहे.शासनातर्फे मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या निवेदनात 'राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालामधील क्रमांक ८ मधील शिफारशींच्या अनुषंगाने सर्वच मराठ्यांचा कुणबी म्हणून समावेश करणे योग्य होणार नाही, असा निष्कर्ष नोंदवण्यात आला आहे. आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने १ जून २००४ च्या शासन निर्णयानुसार मराठा कुणबी आणि कुणबी मराठा या जातींचा इतर मागासवर्गाच्या यादीत अनुक्रमांक ८३ वर समावेश करण्यात आला आहे', असे सविस्तर सांगण्यात आले.

---------------

### बनावट नोटा प्रकरणी

बातमीदारामार्फत शोध घेवुन आरोपी वैभव आगाम यास बीड शहरातील नगर नाका परीसरातुन दिनांक ३१/०८/२०२५ रोजी ताब्यात घेवुन अटक केली. त्यानंतर नमुद आरोपीचा साथीदार फरार आरोपीचा शोध घेत असतांना तो नारायण गड येथे असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी तात्काळ जावुन आरोपी नामे बापुराव परजने यास ताब्यात घेवुन गुन्ह्यात अटक केली असुन त्याचेकडुन ५०० रु. दराच्या एकुण ३० व १०० रु. दराच्या १९ असे एकुण १६,९००/- रु.किंमतीच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. सध्या सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपी हे पोलीस कोठडी मध्ये असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर हे करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत , अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बीड बाळकृष्ण हनपुडे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, पोहवा/१६६४ रवी आघाव, पोहवा/११० सुनिल राठोड, मपोह/८३६ कांबळे, पोशि/१३८५ राजेभाऊ जाधव, पोशि/४८५ विलास कांदे, पोशि/२७३ नवनाथ डाके, पोशि/१७७ प्रविण भाकरे, होमगार्ड शेंदाडे यांनी केली आहे.

--------

### पनीर, दूधसह अनेक

जीएसटी दर आहे तोच ठेवण्याचा निर्णय घेतला. सोने आणि चांदीवर ३ टक्के जीएसटी आणि दागिने बनवण्याच्या शुल्कावर ५ टक्के जीएसटी लागू राहील. उदाहरणार्थ, जर तुम्ही १ लाख रुपयांचे सोने आणि चांदी खरेदी केली तर तुम्हाला त्यावर ३००० रुपये जीएसटी भरावा लागेल. आरोग्य विमा, पनीर पराठा, परोटा,खाकरा, चपाती, तंदूर रोटी, दूध, पिझ्झा, ३३ जीवनरक्षक औषधे, गंभीर आणि दुर्मिळ आजारांवरची औषधं, पेन्सिल, शार्पनर, क्रेयॉन्स, खोडरबर, वह्या, नकाशे, चार्ट, ग्लोब या वस्तूंवर शून्य टक्के जीएसटी लागणार आहे. इलेक्ट्रीक गाड्या, केसांचे तेल, शाम्पू, टूथपेस्ट, टूथ ब्रश, साबण, दाढीचे साबण, बटर, तूप, चीज, पाकिटातले नमकीन, भुजिया, मिक्श्चर, बाळाची दुधाची बाटली, डायपर, नॅपकिन्स, शिलाई मशिन आणि तिचे सुटे भाग, थर्मोमीटर, ग्लुकोमीटर आणि टेस्ट स्ट्रीप्स, चष्मे, रोगनिदानाची उपकरणे, ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचे टायर्स, सुटे भाग, जलसिंचन, तुषारसिंचनाची उपकरणे, कृषी उपकरणे, कृषी फवारणी औषधांवर फक्त ५ टक्के जीएसटी आकारण्यात येणार आहे.

-------------

### जरांगेंसह मराठा समाजाचीही

आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर सरकारने काढलेल्या शासन निर्णयावर बोलताना त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा संदर्भ दिला. सर्वोच्च न्यायालयानेही सर्वच मराठा हे कुणबी आहेत असे सरसकट ग्राह्य धरता येत नाही, असे सांगितलेले आहे. म्हणूनच भाजपने जीआरमार्फत जो निर्णय घेतला आहे, तो फसवणारा आहे, असा थेट आरोप त्यांनी केला. तसेच, या शासन निर्णयाच्या माध्यमातून राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समितीलाही फसवण्यात आले आहे. निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या समितीलाही फसवण्याचे काम करण्यात आले. मनोज जरांगे हे आंदोलनाला बसले होते. त्यांच्यासोबत इतरही अनेक कार्यकर्ते होते. त्यांनाही फसवलेले आहे, असेही भाष्य त्यांनी केले.

-------

### देवबाप्पा, तीन वर्षे झाली बाशिंग

यात प्रतिनिधी करण्याचा मान या पंचायत राज मुळे मिळाला. विशेष म्हणजे शरद पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकात महिलांना ५० टक्के जागा आरक्षित करण्याचा निर्णय घेतला. ही बाब आनंदाचीच म्हणावी लागेल, पण गणपती बाप्पा असे निर्णय घेऊन जर निवडणुकाच होत नसतील तर अशा निर्णयाचा फायदा कोणाला. आजही शहरात आणि ग्रामीण भागात अनेक अडचणी आहेत. या अडचणी जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा नगरपरिषद महानगरपालिका या माध्यमातून त्या त्या भागातील प्रतिनिधित्व करणारे लोकप्रतिनिधी करत असतात. पण सध्या त्यांचाही कार्यकाळ संपुष्टात आला आहे. सध्या महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये प्रशासकांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. प्रशासकावरच हा कारभार चालत असल्याने सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी आणि प्रश्न सुटले जात नाहीत तर, दाद कोणाकडे मागावी. राज्यातील १४ कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करणारे या सरकारला आणखी निवडणुका जाहीर करण्याचा मुहूर्त सापडत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल. नगरपालिका महानगरपालिकेमध्ये २०१७ मध्ये चार सदस्यांचा प्रभाव होता. नगरपालिकेमध्ये थेट जनतेमधून नगराध्यक्ष निवडीचा अधिकार होता, त्यानंतर प्रभाग रचना बदलण्याचा निर्णय घेतला. मध्यंतरी ओबीसी आरक्षणावरून निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. या निवडणुका २०२२ मध्ये होणे अपेक्षित होत्या मात्र २०२२ ते आता २०२५ या तीन वर्षाच्या कार्यकाळात निवडणुकाला मुहूर्त लागला नाही. दुसरीकडे २०२२ पासून भावी नगरसेवक, भावी जिल्हा परिषद सदस्य, भावी पंचायत समिती सदस्य गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. सरकारच निवडणुका जाहीर करत नसेल तर आत्ताच गाठीभेटी घेऊन काय उपयोग, म्हणून जनतेच्या प्रश्नाला बगल दिली जात आहे तर दुसरीकडे संबंधित संस्थांवर प्रशासक असल्याने त्यांच्याकडून न्याय मिळेलच ही अपेक्षा फारच कमी आहे. तेव्हा देवबाप्पा, या सरकारला सुबुद्धी द्या. अनेक अडचणी, अनेक मोर्चे, आंदोलने सुरू होते आता यातून आपण मार्ग काढला आहे. सरकारही मोकळे झाले आहे, तेव्हा या रखडलेल्या निवडणुका तातडीने घेणे गरजेचे आहे तरच या तुमच्या भक्तांचे प्रश्न सुटले जातील. हे गाऱ्हाणे तुमच्याकडेच का मांडतो, कारण सरकारकडे ऐकून घ्यायला वेळच नाही. निवडणुका जाहीर झाल्या तर त्याला काही ना काही कारण सांगून त्या पुढे ढकलल्या जात आहेत. कोरोनाचा काळ असल्यामुळे त्या काळात निवडणुका होऊ शकल्या नाही हे मान्य असले तरी मात्र पुढे २३ मध्ये निवडणुका जाहीर करणे अपेक्षित होते. परंतु अद्यापही तसे काही झाले नाही. पण गेल्या तीन वर्षापासून सर्वच संस्थावर प्रशासक असल्याने नागरिकांची लहान सहन कामे होत नाहीत याला जबाबदार सरकारच आहे. त्यामुळे देवबाप्पा, या सरकारला सुबुद्धी देऊन या निवडणुका लवकरात लवकर घेण्याचे सांगा म्हणजे प्रशासनात सुसूत्रता येईल. गोरगरिब नागरिकांचे प्रश्न सुटले जातील. हीच माफक अपेक्षा आहे. यामुळे गेल्या तीन वर्षापासून गुडघ्याला बाशिंग बांधलेल्या भावींना मुहूर्त निघाल्यानंतर जोश येईल आणि ते आनंदी होतील.

--------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. ०५ सप्टेंबर २०२५ | ३

## मांजरा प्रकल्पाचे दोन गेट उघडले

केज । प्रतिनिधी

मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे पाणीपातळी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने दि.४ सप्टेंबर रोजी मांजरा धरणाचे २ व ५ नंबर गेट ०.२५ मिटरने उघडण्यात आले. मांजरा धरणाची ६ वक्रद्वारे चालू असून मांजरा नदीपात्रात ५२४१ क्यूसेक्स इतका विसर्ग सुरू आहे. या धरणामध्ये पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढविणे किंवा कमी करणे याबाबत निर्णय घेण्यात येईल. नदीकाठावरील सर्व गावांना तसेच पुरामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन मांजरा प्रकल्प धनेगाव पूरनियंत्रण कक्षाच्या द्वारे करण्यात आले आहे.

## थोडक्यात...



### योग्य नियोजन न करता रस्ता केल्याने मस्के कुटुंबाच्या घरात पाणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैद्यकीनी गावामध्ये योग्य नियोजन न करता रस्ता केल्यामुळे रस्त्यावरचे पाणी थेट घरामध्ये घुसून मस्के कुटुंबाचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाचे पाणी घरात शिरल्याने घरगुती साहित्य, धान्यसाठा तसेच अन्य वस्तूंचे नुकसान झाले असून कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे.रस्ता करताना बांधकामाचे योग्य नियोजन न केल्यामुळे या घटनेला ग्रामसेवक जबाबदार असल्याचा आरोप मस्के कुटुंबाने केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी ग्रामसेवकावर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी दिपक मस्के यांनी केली आहे. नुकसानीची भरपाई तसेच भविष्यात अशा प्रकारचा अनर्थ टाळण्यासाठी पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची योग्य व्यवस्था करावी, अशी मागणीही मस्के यांनी प्रशासनाकडे केली आहे.



### जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील,जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त पहाडी पारगाव,ढगेवाडी ग्रुप ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्य तथा कोळी महासंघ,बीड लोकसभा अध्यक्ष श्री.गोरख आबा पूर्णे यांच्यावतीने दि. ४ सप्टेंबर २०२५ गुरुवार रोजी वही,रजिस्टर,पेन अदीशालेय साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक परमेश्वर साखरे सर,शालेय समितीचे अध्यक्ष बंडू मुंडे,उपाध्यक्ष बाळकृष्ण अंडील,अनंत बिल्पे,कन्हैया मुंडे,संग्राम पाटोळे,प्रदीप अंडील,करण पाटोळे,चंद्रसेन पाटोळे,अशोक पाटोळे,अर्जुन पाटोळे,राहुल पाटोळे, कृष्णा गायकवाड,वचिष्ट पाटोळे,भागवत मुंडे,अभिषेक पाटोळे,मिलिंद पाटोळे,विशाल पाटोळे,कृष्णा मस्के तसेच शाळेतील शिक्षक-शिक्षिका मान्यवर म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी १४ सप्टेंबरपर्यंत ई-पीक पाहणी पूर्ण करावी

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांनी येत्या १३ सप्टेंबर पर्यंत ही पीक पाणी पूर्ण करावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी केले आहे.**

**खरीप हंगाम २०२५-२६ साठी सुरू असलेली ई-पीक पाहणी मोहीम अजूनही मंद गतीने सुरू असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे . जिल्ह्यात एकूण २१ लाख ८६ हजार ५४८ प्लॉट्स पाहणीस पात्र आहेत ; त्यापैकी केवळ ४ लाख १ हजार १७८ प्लॉट्स (१८.३५ टक्के) नोंदवले गेले आहेत.**



छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर , बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी वेळोवेळी शेतकऱ्यांना आणि प्रशासनाला आवाहन करून पाहणी वेगाने करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. शेतकरी यांच्या स्तरावर नोंदणीची अंतिम तारीख १४ सप्टेंबर २०२५ असून , त्यानंतर सहायक यांच्या मार्फत नोंदणी होऊ शकते . ई-पीक पाहणी ४.०.० ॲप हे सोपे आणि उपयुक्त : हे ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध असून ते अपडेट करून घेणे आवश्यक आहे . शेतकऱ्यांनी गट क्रमांक , खाते क्रमांक व पीक तपशील भरून शेतातील फोटो अपलोड करायचा असतो . नोंदणी झाल्यानंतर पावती जतन करता येते . ही नोंदणी शेतकऱ्यांच्या पीक विमा , कर्ज , शासकीय अनुदान आणि खरेदी प्रक्रियेसाठी अत्यावश्यक आहे . पीक पाहणी टप्प्याटप्प्याने कशी कराल : १. मोबाईलवर ई-पीक पाहणी ४.०.० ॲप डाउनलोड / अपडेट करा . २. लॉगिन करून गट क्रमांक आणि खाते क्रमांक प्रविष्ट करा.३. पिकाचे नाव व क्षेत्रफळ भरा.४. शेतातील थेट फोटो काढून अपलोड करा.५. माहिती तपासून नोंदणी सबमिट करा.६. नोंदणी पूर्ण झाल्यावर पावती डाउनलोड करून जतन करा.तालुकानिहाय स्थिती (दि. २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत ) : केज तालुका आघाडीवर असून येथे ३३.५८% नोंदणी (९३,४१४ प्लॉट्स / ४६,६७० हेक्टर) झाली आहे . माजलगाव ३०.३५% , अंबाजोगाई ३१.५६% , परळी २९.०३% , वडवणी २०.३% इतकी नोंदणी झाली आहे . बीड तालुक्यात सर्वाधिक पात्र प्लॉट्स (३.८७ लाख) असून त्यापैकी फक्त १४.८५% (५७,८५० प्लॉट्स) ची नोंद झाली आहे . आष्टी (४.३८%) , पाटोदा (६.५२%) , शिरूर (११.७७%) या तालुक्यांमध्ये नोंदणी अत्यल्प आहे . एकूण जिल्ह्यात २,५३,८६८ हेक्टर क्षेत्र नोंदवले गेले असून हे एकूण क्षेत्रफळाच्या केवळ १८.३५% इतके आहे. ई पीक पाहणीचे फायदे व प्रशासनाचे आवाहन : निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्पष्ट केले की , " ई-पीक पाहणी नोंदणी म्हणजे फक्त औपचारिकता नाही . भरपाई , पीक कर्ज , अनुदान , शासकीय खरेदी यासाठी ही नोंदणी अत्यावश्यक आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले , " शेतकरी बांधवांनी अंतिम तारखेपूर्वी नोंदणी पूर्ण करावी . अडचण आल्यास ग्रामपंचायत , कृषी सहाय्यक किंवा महसूल अधिकारी यांच्याकडे त्वरित संपर्क साधावा. ई-पीक पाहणी म्हणजे शेतकऱ्यांच्या हक्काची नोंद आहे . ही नोंदणी शेतकऱ्यांचे पीक सुरक्षित ठेवते , योग्य दर मिळवून देते आणि भविष्यासाठी संरक्षणाची हमी देते.

## शहाणे कुटुंबाकडून गौरी लक्ष्मीच्या उत्सवात पर्यावरण मुक्त संदेश देऊन विविध देखाव्यासह उत्सव साजरा

**घाटनांदुर । प्रतिनिधी**

**येथील परमेश्वर सोमनाथ शहाणे यांनी गौरी लक्ष्मीच्या उत्सवात विविध देखाव्यातून डेकोरेशन कागदापासून व माती पासून बनवण्यात आले पर्यावरण मुक्त डेकोरेशन घाटनांदुर येथील परमेश्वर शहाणे यांच्या कुटुंबाच्या वतीने करण्यात आले होते.**



तुळजापूरची तुळजाभवानी देवीच्या देखाव्यासह ,गोंधळ , परडी ,प्रदूषण मुक्त डेकोरेशन कागदापासून तयार केलेला तुळजापूरच्या देवीच्या मंदिराचा देखावा, शक्तिपीठ, गायमुख, रामायणाचे डेकोरेशन, सीतेचे स्वयंभर , हनुमानाची अशोक वाटिका मध्ये सीतेची भेट, जटायू, राम सेतू शिबिराची बोर, सीतेचा आवरणसगळे डेकोरेशन गौरी पूजनाच्या व गणपतीचा उत्सवात असे अनेक देखावे परमेश्वर शहाणे यांनी बनवले आहेत हे सर्व विविध देखावे बनवण्यासाठी परमेश्वर शहाणे यांना सहा महिने लागले आशा विविध देखाव्यातून नागरिकांना पर्यावरण मुक्तीचा संदेश देऊन शहाणे कुटुंबाच्या वतीने असा प्रदूषण मुक्त चा उपक्रम करण्यात आला आहे असा वेगळी सजावट केल्याने घाटनांदुर येथील परिसरातील महिलांनी व नागरिकांनी देखावा पाहण्यासाठी गर्दी केली.

## सह्यगिरी विचारमंचच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील शिंदे वस्तीवरील जि.प.प्राथमिक शाळेतील गरजु विद्यार्थ्यांना सह्यगिरी विचारमंच कोल्हापूर यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



युसूफवडगावचे येथील पण सध्या कोल्हापुर जिल्ह्यात जि.प मध्ये प्राथमिक शिक्षक म्हणुन कार्यरत असलेले सह्यगिरी विचारमंचचे संचालक अमोल जोगदंड हे त्यांच्या सहकाऱ्यांसह शिक्षण क्षेत्रात गरिब व गरजु विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर विविध शैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्पर्धा परीक्षांचे मोफत मार्गदर्शन देऊन हजारो विद्यार्थी घडवण्याचे काम करतात.तसेच आपल्या मुळगावी युसुफवडगांव व युसुफवडगांव केंद्रातील प्रत्येक शाळेवर ते गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्याचे काम करत असतात अशा या सामाजिक संस्थेच्यावतीने युसुफवडगांव येथील शिंदेवस्तीवर असलेल्या जि.प.प्राथमिक शाळेतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना यावेळी शैक्षणिक साहित्य संचाचे वितरण करण्यात आले.यावेळी व्हा.चेअरमन महादेव मोडवे,शा.व्य.समितीचे अध्यक्ष नवनाथ जाधव,उपाध्यक्ष सुशिल शिंदे,विकास जाधव,पत्रकार सचिन उजगरे,जयराज निशिगंध,अनिल निकम,छत्रुगण निकम,योगीराज शिंदे,शिक्षीका सौ.सरिता करंजकर.सौ.मंगल गोसावी,सौ.आश्विनी निशिगंध हे उपस्थित होते.

## जयहनुमान गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर

दिंद्रुड । प्रतिनिधी

गणेश उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या उद्देशाने माजलगाव तालुक्यातील चोपनवाडी येथील जयहनूमान सार्वजनिक गणेश मित्र मंडळाने रक्तदान शिबिराचे आयोजन गुरुवारी सकाळी केले होते. २० रक्तदात्यांनी याप्रसंगी रक्तदान केले. मंडळाच्या वतीने दररोज विविध सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या मंडळांने लोकोपयोगी उपक्रम राबवून सार्वजनिक गणेशोत्सवाचा उद्देश सार्थकी लावल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.




गणेशोत्सवानिमित्त विविध गणेश मंडळ सामाजिक उपक्रम राबवत आहेत. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान या उक्तीप्रमाणे चोपणवाडी येथील जयहनूमान सार्वजनिक गणेश मंडळांच्या तरुणांनी शनिवारी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. मंत्रालयातील आरोग्य विभागचे सहाय्यक कक्षप्रमुख सचिन व्यंकटी वनवे, लेखा परिक्षक दिपक वनवे, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर, पत्रकार संतोष स्वामी, गणेश काटकर, सरपंच विलास बडे यांची प्रमुख उपस्थिती या प्रसंगी होती.

परळी येथील वैद्यनाथ ब्लड बँकेच्या टीमने रक्त संचयन केले. २० रक्तदात्यांनी याप्रसंगी रक्तदान केले. क्षयरोग प्रतिबंधक लस व विविध आजारांवर रोग निदान शिबिराचे गणेशोत्सवा दरम्यान आयोजन करण्यात आले होते. आबालवृद्धांनी या शिबिराचा लाभ घेतला. तसेच महिलांसाठी विविध स्पर्धा, समाज प्रबोधनासाठी किर्तन व भारुड यांच्या आयोजन करण्यात आले होते. संबळ वाद्य व जागरण गोंधळातील विविध कलाप्रकार सुद्धा सादर करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ वनवे, उपाध्यक्ष: धनराज पडूळे, सरपंच विलास बडे, बालासाहेब वनवे, माजी उपसरपंच हनुमंत फुक्टे, अंगद वनवे, विठ्ठल डीसले. राजेभाऊ भोसले, रोहन वनवे, विकास वनवे, आदित्य वनवे, विकास भोजने, अविनाश ढणे, राहुल ढने, हनुमंत डिसले, शरद वनवे, अनंत वनवे, धर्मराज वनवे, अशोक वनवे, रणजीत वनवे, सुरेश वनवे, वामनराव वनवे यांनी या शिबिराच्या आयोजन केले होते.

## पारंपरिक वाद्य संस्कृती जोपासण्याचे काम प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे ढोल ताशा वाद्य स्पर्धेतून जोपासत आहे -पो नि. शरद जोगदंड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्या सर्वत्र डॉल्बीचे पेव फुटले असतानाही आपली पारंपरिक वाद्य संस्कृती जोपासण्याचे काम प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ हे ढोल ताशा वाद्य स्पर्धेच्या माध्यमातून जोपासत असल्याचा आनंद अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी व्यक्त केला. ते अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने आयोजित भव्य अशा ढोल ताशा पथक वाद्य स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आयोजक संकेत राजकिशोर मोदी यांच्यासह सहा पोलीस निरीक्षक कांबळे, दैनिक लोकमत चे अविनाश मूडेगावकर, आधार माणुसकीचे ॲड संतोष पवार, मनोज लखेरा, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष महादेव आदमाणे, माजी नगरसेवक अमोल लोमटे, दिनेश भराडीया, सुनील वाघाळकर, पंडित हलगुंडे, सय्यद रशीद , शाकेर काझी, विजय रापतवार, खलील जाफरी, भीमसेन लोमटे, माणिक वडवणकर , राम घोडके यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



या स्पर्धेची सुरुवात श्रीगणेश पूजन, वाद्य पूजन व श्रीफळ फोडून करण्यात आली. या स्पर्धा आयोजित करण्याची कारणमीमांसा संकेत मोदी यांनी आपल्या प्रस्ताविकातून केली. पुढे बोलताना ते म्हणाले की अंबाजोगाई शहर हे शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेसाठी संपूर्ण मराठवाड्यात ओळखले जाते. या परंपरेला अधिकाधिक जोपासण्याचे आणि पुढे नेण्याचे काम प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक व व्यायाम मंडळाने गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. वेळोवेळी समाजहिताचे उपक्रम राबवून मंडळाने नेहमीच शहराचे वैभव वाढवले असल्याचे संकेत मोदी यांनी स्पष्ट केले.

मंडळाचे अध्यक्ष राजकिशो

## बीड सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्सतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

**बीड सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्सतर्फे दरवर्षी शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्याची परंपरा यावर्षीही जोपासली जाणार आहे. "आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५" या पुरस्कारासाठी सहोदया सदस्य असलेल्या सीबीएसई शाळांमधील गुणवंत शिक्षकांची निवड करण्यात आली असून एकूण २७ शिक्षकांना या सन्मानाने गौरविण्यात येणार आहे. निवड झालेल्या शिक्षकांनी त्यांच्या शाळेमध्ये शैक्षणिक उन्नतीसाठी योगदान दिलेले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात मोलाची कामगिरी बजावली आहे. नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, शिस्तबद्धता, समाजाभिमुख कार्य आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या अशा शिक्षकांचा गौरव हा पुरस्काराद्वारे करण्यात येणार आहे.**

आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ चे मानकरी पुढील प्रमाणे आहेत: श्रीमती. विजीथा वि जि (अनिशा ग्लोबल स्कूल आष्टी) , सौ. कविता बाबर (भारती बांगर इंटरनॅशनल स्कुल गेवराई), श्री. नयूम शेख (भेल सेकंडरी स्कुल परळी), श्री.अमोल सांजेकर (कॅनवास इंटरनॅशनल स्कुल कळंब), श्रीमती. हर्षदा सोनावणे (छत्रपती संभाजीराजे ग्लोबल स्कुल जोगाईवाडी), श्री. किरण देशमुख (दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कुल परळी), श्री.इरफान जाफर बावज़ीर (ज्ञानेश्वर पब्लिक स्कुल बीड), श्रीमती. कल्पना इंगोले (इगलवूड इंग्लिश स्कुल माजलगाव), श्रीमती.आशा कुटे (गुरुकुल इंग्लिश स्कुल बीड), श्रीमती. लुईड्स फर्नांडिस (गुरुकुल पब्लिक स्कुल बीड), श्री. बसवराज मन्याळीकर (एम आय टी श्री सरस्वती पब्लिक स्कुल अंबाजोगाई), श्री.पांडुरंग गाडे (महावीर इंग्लिश स्कुल कडा) , श्री. अमित काळे (नारायना इ-टेक्नो स्कुल बीड), श्री. प्रिंसिड चेरुवोडेन (न्यू व्हिजन पब्लिक स्कुल अंबाजोगाई), श्रीमती. जागृती चव्हाण (पोदार इंटरनॅशनल स्कुल अंबाजोगाई), श्रीमती. मनीषा काकडे (पोदार इंटरनॅशनल स्कुल बीड), श्रीमती.अर्चना टेके (आर के पब्लिक स्कुल गेवराई), श्री.सीताराम कराड (राजस्थानीज पोदार लर्न स्कुल परळी), श्री.राजेंद्र निशिगंध (शारदा इंग्लिश स्कुल केज), श्री.सुरज भोजने (शारदा इंग्लिश स्कुल डिकसळ कळंब), श्री.सचिन डोंगरे (शिव शारदा पब्लिक स्कुल गेवराई), श्री. जीबी ऑगस्टन (सिंदफणा पब्लिक स्कुल माजलगाव), श्री.कर्मवीर औताडे (सिनर्जी नॅशनल स्कुल अंबाजोगाई), श्रीमती.वर्षा कोरडे (केम्ब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कुल गेवराई), श्री.कमलेश गोरजिले (व्हिजन पब्लिक स्कुल सोनपेठ), श्री.वैजनाथ तेलंग (यश इंटरनॅशनल स्कुल दिंद्रुड), श्रीमती.मॅरी मॅथ्यू (ट्विंकलिंग स्टार स्कुल बीड) हा भव्य सन्मान सोहळा शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी, ईगलवुड इंग्लिश स्कूल, माजलगाव येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात निवड झालेल्या शिक्षकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि विशेष पारितोषिक प्रदान करून त्यांचा सत्कार होईल. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांच्या कुटुंबाला सुद्धा या सोहळ्यासाठी निमंत्रण देण्यात आले असून यावेळी प्रमुख पाहुणे, मान्यवर शिक्षणप्रेमी तसेच सर्व सदस्य शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. बीड सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्सतर्फे दरवर्षी दिला जाणारा हा पुरस्कार शिक्षकांना प्रोत्साहन देणारा ठरत असून त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान करण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून देतो. या उपक्रमामुळे शिक्षकांमध्ये नवचैतन्य निर्माण होऊन दर्जेदार शिक्षणाची प्रेरणा मिळते. समाज घडविणाऱ्या या शिक्षकांचा गौरव करून त्यांच्या योगदानाचे मोल अधोरेखित करणे हा या पुरस्काराचा मुख्य हेतू आहे. - श्री. शितल सर्वज्ञ ( सचिव, बीड सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्स तथा प्राचार्य, गुरुकुल इंग्लिश स्कूल, बीड)

## शहरांतर्गत हवाई वाहतूक सेवा सुरू करण्याच्या मागणीनंतर रस्त्यावरील खड्डे भरले

### नवीन बनविण्याऐवजी ठिगळ लावून बीड शहरवासियांची चेष्टा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरांतर्गत रस्त्यांवर हवाई वाहतूक सेवा सुरू करा या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविल्यानंतर राजुरीवेस ते कारंजा टॉवर पर्यंत च्या रस्त्यावरील खड्डे काँक्रिटीकरणाने भरण्यात आले आहे. बीड नगर परिषदेची ही कार्य क्रिया म्हणजे बीड शहरवासियांची केलेली एक प्रकारची चेष्टाच असल्याचा घणाघात मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केला आहे.**

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून बीड शहरातील काही ठराविक रस्ते हे अत्यंत दयनीय अवस्थेत गेलेले आहेत. ज्यामुळे या रस्त्यांवरून चालताना बीड शहरवासियांच्या नाकीनऊ येत आहे. परंतु याचे कुठलेही सोयरसुतक ना शासनाला आहे, ना प्रशासनाला. हे पाहता जिल्हाधिकारी यांच्यामार्फत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री यांना ही सर्व बाब दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात स्पष्ट केली होती, तसेच त्यात या खराब रस्त्यांवरील खड्डे काँक्रिटीकरणाने किंवा डांबरीकरणाने बुजविण्याची प्रक्रिया अजिबात करता कामा नये ते नवीनच बनविण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती. या निवेदनाची प्रशासनाकडून नोंद तर घेण्यात आली परंतु नवीन रस्ते न करता आहे त्याच खड्डेयुक्त रस्त्यांचे मोठमोठे खड्डे काँक्रिटीकरणाने भरण्यात आले. डांबरी रस्त्यावरील खड्डे सिमेंटकाँक्रीट ने भरण्याचा निर्णय घेतलेले अधिकारी आणि अभियंते कोण? असा प्रश्न उपस्थित करून लहान-सहान खड्डे तसेच सोडून देण्यात आल्याचेही म्हटले आहे. यामुळे बीड नगर परिषदेकडून करण्यात आलेली ही कार्य क्रिया म्हणजे बीड शहरवासियांची एक प्रकारची चेष्टाच असल्याचा घणाघात मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केला आहे.

cmyk

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५
४

# देशातील पाच कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा!

## सर्वोच्च न्यायालयानं दिला महत्वपूर्ण निर्णय

देशात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्यात येवू नये तसेच इथेनॉल शिवाय पर्यायी इंधन वापरण्याची मुभा द्यावी यासाठी सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई व न्यायमुर्ती के विनोद चंद्रन या खंडपीठाने सुनावणी केली. यांसदर्भातील याचिका न्यायालयानं फेटाळली आहे. त्यामुळं देशातील ५ कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याची प्रतिक्रिया स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली.

भारतामध्ये विकल्या जाणाऱ्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रित

देशातील क्रुड ऑईलचा व्यापार करणारे व्यापारी, काही परदेशी बनावटीच्या गाड्यांच्या कंपन्याच्यावतीने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्यात येवू नये याकरिता सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करण्यात आली होती. यावर सर्वोच्च न्यायालयानं महत्वपूर्ण निकाल दिला आहे. सध्या भारतामध्ये विकल्या जाणाऱ्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रित केले जात



आहे. भारतात ऊसापासून व धान्या जवळपास १६८५ कोटी लिटर इथेनॉलचे उत्पादन घेतले जात आहे. देशातील मुठभर क्रुड ऑईलचे व्यापारी व काही वाहन कंपन्यांनी हेतुपुर्वक स्वत:च्या स्वार्थासाठी इथेनॉल बाबत गैरसमज पसरवित आहेत.

इथेनॉल धोरणास चालना, भारत सरकारची परकीय चलनाची १ लाख ४४ हजार कोटीची बचत

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इथेनॉल धोरणास चालना दिल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये परकीय चलनाची १ लाख ४४ हजार कोटीची बचत झाली आहे. इथेनॉलच्या वापरामुळे देशामध्ये जवळपास ७३६ लाख टनांनी कार्बनचे उत्सर्जन घटले असून जे ३० कोटी झाडे लावण्याच्या बरोबरीत आहे. इथेनॉल निर्मीतीमुळे देशातील शेतकऱ्यांना याचा थेट लाभ झाला असून ऊस , मका व धान उत्पादक शेतकऱ्यांच्या सर्वाधिक ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला आहे. इथेनॉल निर्मितीमुळे साखर उद्योग स्थिरावल्यामुळे ५ कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना याचा लाभ झाला असून दरवर्षी यामुळे ४० हजार कोटी थेट ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळू लागले आहेत.

ब्राझील, अमेरीका यासारख्या प्रगत राष्ट्रातील वाहनांच्या इंधनामध्ये सर्रास इथेनॉलचा वापर केला जात असताना भारतामध्ये यावर बंदी घालणे म्हणजे कुटनितीचा भाग आहे. यामुळे सदरची आव्हान याचिका फेटाळून भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई व न्यायमुर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने देशातील ऊस , धान व मका उत्पादक शेतक-यांना दिलासा दिला आहे. या ऐतिहासिक निर्णयाचा भारताच्या अर्थव्यवस्थेबरोबरच ग्रामीण , पर्यावरण व कृषी क्षेत्रामध्ये दुरगामी फायदे होणार आहेत.

## गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन



आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत.

आपल्या देशात शेती आणि पशुपालनाची परंपरा खूप जुनी आहे. येथे शेतकरी शेतीसोबतच पशुपालन करून अधिक पैसे कमवू शकतात. त्यामुळेच गाई-म्हशींच्या नवीन जातीचे संगोपन करून त्यांचे दूध विकले जात आहे. गाई आणि म्हशींच्या अनेक प्रजाती जास्त दूध देतात. या जाती डेअरी उद्योगासाठी खूप चांगल्या आहेत. गाईच्या दुधापेक्षा म्हशीच्या दुधाला प्राधान्य दिले जाते. याचे कारण म्हणजे म्हशीचे दूध गाईच्या दुधापेक्षा जाड असते. म्हशीची मुऱ्हा ही जात जास्त दूध देणारी जात मानली जाते. देशातील मोठ्या संख्येने पशुपालक ते पाळतात आणि चांगला नफाही मिळवतात. याशिवाय या म्हशीची दूध देण्याची क्षमताही इतर जातींपेक्षा जास्त आहे. मुर्रा जातीच्या म्हशीचा रंग काळा असतो. याशिवाय त्याची शिंगेही वक्र असतात. मुर्राह म्हशीचे डोके लहान आणि लांब शेपूट असते. तसेच त्याचा मागील भाग चांगला विकसित झाला आहे. या म्हशीच्या डोक्यावर, शेपटीवर आणि पायावरही सोनेरी रंगाचे केस आढळतात. मुऱ्हा म्हशीचा गर्भधारणा कालावधी सुमारे ३१० दिवसांचा असतो. त्याची नीट काळजी घेतल्यास ही म्हैस दररोज २० ते ३० लिटर दूध देते. पशुपालकांनाही या म्हशीच्या दुधाला चांगला भाव मिळतो. मुऱ्हा म्हशीच्या दुधाच्या किमतीबद्दल बोलायचे झाले तर त्याची किंमत बाजारात चांगली आहे. या म्हशीची किंमत ५० हजार रुपयांपासून ते २ लाख रुपयांपर्यंत आहे. हिचे डोके लहान असते. त्याच्या शरीराच्या अनेक भागांवर सोनेरी केस असतात. ती दिवसाला २० लिटर दूध देते. यामुळे शेतकऱ्यांसाठी ही म्हैस फायदेशीर आहे. यामुळे शेतकऱ्यांना दूध व्यवसाय करण्यासाठी याचा फायदा होणार होतो.

## आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे

ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

पाचट काढल्यास हे होतात फायदे :

उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.



पाचट काढताना घ्यायची काळजी :

आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही. बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

## पीक वाढीसाठी समतोल अन्नद्रव्य व्यवस्थापन

नत्र : मुळांद्वारे नत्र हे अन्नद्रव्ये नायट्रेट , अमोनियम या स्वरूपात शोषले जाते. पिकांमधील नत्र या अन्नद्रव्याचे प्रमाण १ ते ५ टक्के असते. नत्र हा वनस्पती पेशींमधील महत्त्वाचा घटक आहे. नत्र अन्नद्रव्ये अमिनो आम्ल, प्रथिने, नुक्लिक ॲसिड, पोरपायरीन्स, फ्लेविन्स, प्युरीन्स, पायरीमिडीन नुक्लिओटाईड्स, विकर, अल्कॅलॉईड्सचा महत्त्वाचा घटक आहे. जास्त कमतरतेमुळे पाने पिवळी पडून करपून जातात. पाने पिवळी पडल्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते, पिकांची वाढ खुंटते. मुळांची वाढ खुंटते, मुळे अधिक तंतुमय होतात. प्रमाण अधिक झाल्यास पानास गर्द हिरवा रंग येतो. पाने, देठ अधिक लुसलुशीत होतात, पिके लोळतात. कीड, रोगांचा प्रादुर्भाव अधिक दिसतो. शिफारशीप्रमाणे जमिनीतून नत्रयुक्त खते (युरिया, अमोनिअम सल्फेट, कॅल्शिअम अमोनिअम नायट्रेट) वापरावीत. सेंद्रिय खते उदा. शेणखत, कंपोष्ट, गांडूळ खत, हिरवळीच्या खताचा वापर करावा.




स्फुरद : पिकांमधील स्फुरदाचे प्रमाण साधारणत: ०.१ ते ०.५ टक्के असते. हे प्रमाण नत्र व पालाशच्या पिकामधील प्रमाणापेक्षा कमी आढळून येते. स्फुरद पिकांच्या मुळांद्वारे आर्थोफॉस्फेट या स्वरूपात शोषले जाते. याचबरोबर स्फुरद सेंद्रिय स्वरूपात (न्युक्लिक आम्ल आणि फायटीन) सुद्धा शोषले जाते. अन्नद्रव्ये पिकांच्या विविध शरीर क्रियांमध्ये भाग घेते. ऊर्जेचे वहन व साठवण हे महत्त्वाचे कार्य आहे. कमतरतेची लक्षणे प्रथमत: जुन्या व पक्व पानांवर अगोदर दिसतात. कर्बयुक्त पदार्थ पानांमध्ये अधिक प्रमाणात जमा झाल्यामुळे पानांना गर्द हिरवा रंग येतो. जास्त कमतरतेमुळे पाने करपल्यासारखी दिसतात. पीक सरळ, कमकुवत व पाने गुंडाळल्यासारखी दिसतात. पाने अरुंद होतात. पानांचा मुख्य खोडाशी असलेला कोन ९० अंशापेक्षा कमी होतो. पानांचा रंग काळपट हिरवा ते निळसर हिरवा होतो, पाने चमकदार दिसतात. पक्वता आणि बियाण्याच्या गुणवत्तेवर अनिष्ट परिणाम होतो. शिफारशीप्रमाणे सेंद्रिय खते उदा. शेणखत, गांडूळ खत, कंपोस्ट, हिरवळीच्या खतांचा वापर करावा.

पालाश : निरोगी पिकामध्ये पालाशचे प्रमाण १ ते ५ टक्यांच्या दरम्यान असते. म्हणजेच ढोबळमानाने ते नत्र अन्नद्रव्याच्या प्रमाणाएवढे असते. पालाश हे असे अन्नद्रव्ये आहे, की ते पिकांमध्ये जास्त प्रमाणात शोषले गेले तरी त्याचे कोणतेही अनिष्ट लक्षण पिकांवर दिसून येत नाही. याचा उपयोग पिकाची चयापचय क्रिया नियंत्रित करण्यासाठी होत असला तरी पिकांच्या वेगवेगळ्या भागांच्या निर्मितीमध्ये सहभाग आढळून येत नाही. पिकांमध्ये कार्यरत असलेल्या साठ पेक्षा अधिक विकरांचे कार्य जलद गतीने होण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे अन्नद्रव्य आहे. यामध्ये स्टार्च व प्रथिन निर्मितीमध्ये भाग घेणाऱ्या विकरांचा समावेश आहे. पानांमध्ये तयार केलेले अन्न पिकाच्या विविध भागांमध्ये पोहोचविण्यासाठी पालाश महत्त्वाचे आहे. पालाश हे अन्नद्रव्य धान्य, फळे, कंद गुणवत्ता सुधारण्यासाठी महत्त्वाचे आहे. महत्त्वाच्या कार्यासाठी पालाश अन्नद्रव्य उपयुक्त आहे. कमी पडल्यास जुन्या पक्व पानांच्या कडा करपतात. पानांची टोके वाळतात व तपकिरी रंगाची होतात. संपूर्ण पान करपते. वाढ खुंटते, वाढीचा वेग मंदावतो. बिया, फळे कमी प्रतीची व सुरकुतलेली दिसतात. जमिनीतील स्थिर किंवा विनिमययुक्त पालाश उपलब्ध होण्यासाठी पालाशचे वहन करणाऱ्या जीवाणू खतांचा वापर बीजप्रक्रियेसाठी अथवा ठिबक सिंचनातून करावा. पालाशयुक्त सरळ (म्युरेट ऑफ पोटॅश, सल्फेट ऑफ पोटॅश इ.) अथवा संयुक्त रासायनिक खतांचा वापर करावा. पीक वाढीदरम्यान पालाश कमतरतेची लक्षणे दिसल्यास विद्राव्य पालाशयुक्त खते फवारणीद्वारे द्यावीत. (उदा. १ टक्के सल्फेट ऑफ पोटॅशची फवारणी करावी).

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय संस्कृत दिन
### शिक्षक दिन भारत

### महत्वाच्या घटना

१९३२ : फ्रेन्च अपर व्होल्टा या प्रांताचे विभाजन करुन आयव्हरी कोस्ट, फ्रेन्च सुदान आणि नायगर असे देश निर्माण करण्यात आले.
१९४१ : इस्टोनिया हा प्रांत नाझी जर्मनीने ताब्यात घेतला.
१९६७ : ह. वि. पाटसकर पुणे विद्यापीठाचे सातवे कुलगुरू झाले.
१९७७ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने बाह्य सौरमालेचा अभ्यास करण्यासाठी व्हॉएजर १ या उपग्रहाचे पृथ्वीवरून उड्डाण केले
१९८४ : एसटीएस -४१-डी ही नासाच्या स्पेस शटल प्रोग्रामची १२ वी फ्लाइट आणि स्पेस शटल डिस्कवरीचे पहिले मिशन होते. हे डिस्कव्हरी यान आपली पहिली अंतराळ यात्रा पूर्ण करून कॅलिफोर्नियामधील एडवर्ड्स एअर फोर्स बेस येथे दाखल झाले.
२००० : ज्येष्ठ दिग्दर्शक हृषीकेश मुकर्जी यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्कार जाहीर
२००५ : इंडोनेशियातील सुमात्रा येथे मंडाला एअरलाइन्सचे 'फ्लाईट ०९१' हे उड्डाण दाट लोकवस्तीच्या भागात कोसळुन विमानातील १०४ आणि जमिनीवरील ३९ लोक ठार झाले.
२०१२ : स्पेनमध्ये टेलिव्हिजनवर बंदी घालण्यात आलेल्या थेट बुलफाईटिंगच्या प्रसारणावर सहा वर्षाची बंदी उठवण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११८७ : लुई (आठवा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ८ नोव्हेंबर १२२६)
१६३८ : लुई (चौदावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ सप्टेंबर १७१५)
१८७२ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि तामिळनाडू राज्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेता व लोकमान्य टिळक यांचे शिष्य वी. ओ. चिदंबरम पिल्लै यांचा जन्मदिन.
१८८८ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: १७ एप्रिल १९७५)
१८९५ : अनंत काकबा प्रियोळकर भाषा व इतिहास संशोधक, लेखक, संपादक व समीक्षक. त्यांनी संपादित केलेल्या विविध ग्रंथात रघुनाथपंडित कृत 'दमयंती स्वयंवर' व मुक्तेश्वरकृत 'महाभारताचे आदिपर्व' हे उल्लेखनीय आहेत. (मृत्यू: १३ एप्रिल १९७३)
१९०५ : प्रसिद्ध भारतीय उपन्यासकार, कथाकार व संपादक वाचस्पती पाठक यांचा जन्मदिन.
१९०७ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (मृत्यू: ३० ऑगस्ट १९८१)
१९२० : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (मृत्यू: २५ नोव्हेंबर २०१३)
१९२८ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (मृत्यू: १९ सप्टेंबर २००४)
१९३३ : आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'रॅमन मॅग्सेसे पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आलेले भारतीय नौदलाचे माजी सेवानिवृत्त प्रमुख अधिकारी व लोकपाल लक्ष्मीनारायण रामदास यांचा जन्मदिन.
१९४० : रॅक्वेल वेल्श अमेरिकन अभिनेत्री
१९५४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेट खेळाडू रिचर्ड ऑस्टिन यांचा जन्म.
१९४६ : मूळ भारतीय वंशाचा ब्रिटीश गायक व संगीतकार फ्रेडी मर्क्युरी यांचा जन्म.
१९८६ : भारतीय क्रिकेटपटू प्रज्ञान ओझा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : लुडविग बोल्टझमन ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २० फेब्रुवारी १८४४)
१९१८ : सर रतनजी जमसेटजी टाटा टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म: २० जानेवारी १८७१)
१९७८ : रघुनाथ रामचंद्र तथा रॉय किणीकर कवी, संवादलेखक, नाटककार व पत्रकार. 'रात्र' आणि 'उत्तररात्र' हे त्यांचे कवितासंग्रह विशेष गाजले. मुंबई आकाशवाणीवरील 'वार्यावरची वरात' व 'मेघदूत' या श्राव्य नियतकालिकांचे ते निर्माते व लेखक होते. (जन्म: ? ? १९०८)
१९८६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय महान वैमानिक नीरजा भनोट यांचे निधन.
१९८६ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शिक्षणतज्ज्ञ व हिंदी साहित्यिक अंबिका प्रसाद दिव्य यांचे निधन.
१९९१ : शरद जोशी पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी कवी, लेखक, व्यंगचित्रकार आणि हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिका संवाद आणि पटकथा लेखक (जन्म: २१ मे १९३१)
१९९२ : अतूर संगतानी उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म:)
१९९५ : सलील चौधरी हिंदी व बंगाली चित्रपटसृष्टीतील संगीतकार (जन्म: १९ नोव्हेंबर १९२२ चिंगरीपोथा, २४ परगणा, पश्चिम बंगाल)
१९९६ : भारतीय बिशप बॅसिल सालदवदोर डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ मे १९२६)
१९९७ : मदर तेरेसा शांततेचा नोबल पारितोषिक आणि भारतातील सर्वोच्च नागरिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध समाजसेविका, व कॅथोलिक चर्चच्या धर्मगुरू (जन्म: २६ ऑगस्ट १९१०)
२००० : रॉय फ्रेड्रिक्स वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (जन्म: ११ नोव्हेंबर १९४२)
२०१५ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर २०१५)

cmyk

# सुवर्णयुग तरुण मंडळाने किल्ले स्वच्छ करत वारसा जपण्याचे काम केले -संजीवनी पाटील

जामखेड। प्रतिनिधी

आपल्या गावातील व परिसरातील ऐतिहासिक वास्तू या आपल्याला आपल्या इतिहासाची, परंपरेची आणि संस्कृतीची आठवण करून देतात. त्यांचे जतन करणे हे केवळ शासनाचे काम नसून समाजातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी निस्वार्थ भावनेने सुवर्णयुग तरुण मंडळाने समर्थपणे पार पाडत वारसा जपण्याचे काम केले आहे. मंडळाच्या या उपक्रमामुळे पुढील पिढ्यांना आपल्या इतिहासाची जाणीव राहील, असे प्रतिपादन खर्डा गावच्या सरपंच तथा भाजप महिला अध्यक्षा संजीवनी पाटील यांनी केले. सुवर्णयुग तरुण मंडळ पाथर्डी यांच्यावतीने किल्ले शिवपट्टण (खर्डा ता. जामखेड) येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याप्रसंगी संजीवनी पाटील बोलत होत्या.




यावेळी बाजार समितीचे संचालक वैजीनाथ पाटील,ग्रामपंचायत सदस्य महालिंग कोरे, भाजपा तालुका सरचिटणीस बाळासाहेब गोपाळघरे,विस्तार अधिकारी अशोक आंधळे, केशव गायकवाड, धीरज उदमले, हुसेन बादशाह, मंडळाचे अध्यक्ष गोपालसिंग शेखावत, वैभव शेवाळे आदी उपस्थित होते. वैजीनाथ पाटील म्हणाले,आजच्या पिढीला इतिहासाची खरी जाणीव करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे अशा उपक्रमातून मंडळाने समाजात जागरूकता निर्माण करून एक पाऊल पुढे टाकले आहे. ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी सरकार, ग्रामपंचायत आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्र येणे गरजेचे आहे. सुवर्णयुग मंडळाने जो आदर्श ठेवला आहे, तो प्रत्येक संस्थेने आत्मसात करावा.

मंडळाने किल्लच्याच्या आतील पायऱ्यांवरील, प्रवेशद्वार येथील झाडाजुडपे,गवत आणि कचरा गोळा करून स्वच्छता केली.मंडळाचे मोहनजी यादव, अमोल कांकरिया, मोनिष उदबत्ते,ओमकार जोशी, मोनल जोजारे, शैलेंद्र दहिफळे, अक्षय दातीर, ओम पाचरणे, मुकुंद सुराणा, कुणाल महानवर, दत्ता पंडित, सचिन आल्हाट, सनी भोसले, अभी कांबळे, किरण दिनकर, अजिंक्य घोरपडे, लखन दोडके आदी उपस्थित होते. ग्रामपंचायत सदस्य महालिंग कोरे यांनी आभार मानले.

## आ.खोतकर यांच्या हस्ते महानगरपालिकेत गणपतीची आरती



जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका जालना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ म न पा जालना आज कार्यालयात श्री गणेशाची महाआरती आमदार श्री अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते करण्यात आली सर्व भक्तांना महाप्रसाद भंडारा वाटप केला.

यावेळी पंडितराव भूतेकर उपस्थित अधीक्षक विजय फुलंब्रीकर लेखा विभागाचे सचिन मेहरा संजय भालेराव, प्रमोद वाघमारे राजेश बगळे अजय प्रेमभर्ती बंडू चव्हाण पंडित पवार संतोष निकम सावता तरासे विकास जैस्वाल प्रफुल्ल आंबेकर अनिल वानखेडे शेख कादर देवानंद तुपेकर हितेंद्र आगळे मनोज गिरे लक्ष्मीकांत नाकडे अस्लम बेग नामदेव म्हस्के शिवाजी माली अरेफ बेग पिंपलेकर महाराज किरण पाटील दीपक देशपांडे संदीप म्हंस्के व सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यासोबतच आज महाप्रसादाचा भांडाऱ्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे जालना शहर महानगरपालिकेत सार्वजनिक गणेश मंडळ मनपा जालना आज रोजी अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते बाप्पाची आरती करण्यात आली

## ''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा''स्पर्धेत पंचक्रोशी विद्यालय नायगावला तालुकास्तरीय तृतीय क्रमांक



खर्डा । प्रतिनिधी

नायगाव येथील पंचक्रोशी विद्यालयाने ''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'' या उपक्रमांतर्गत आयोजित तालुकास्तरीय स्पर्धा टप्पा २ सन २०२४-२५ या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शाळेच्या स्वच्छता, सुंदर सजावट, हरितीकरण, भित्तीचित्रे, शैक्षणिक वातावरण तसेच विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाच्या बळावर शाळेला तालुकास्तरीय तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

सदर पुरस्काराचे वितरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शुभम जाधव, विस्तार अधिकारी जालिंदर खताळ, नायगाव केंद्राचे केंद्रप्रमुख मोहिते तसेच जामखेड बाजार समितीचे सभापती शरद कार्ले यांच्या उपस्थितीत करण्यात आले. विद्यालयास पुरस्कार मिळाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा कर्जत जामखेडचे विद्यमान आमदार रोहित पवार तसेच रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी तोरणे, नाईकवाडे तसेच स्थानिक स्कूल कमिटी, शालेय व्यवस्थापन समिती प्रमुख व सदस्य गावचे सरपंच व सदस्य, सोसायटी सर्व सदस्य व पालक यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू भगिनी व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले. या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांचे योगदान मोलाचे ठरले आहे. या सन्मानामुळे शाळेचा गौरव वृद्धिंगत झाला असून, पुढील काळात पंचक्रोशी विद्यालय आणखी प्रगतीपथावर वाटचाल करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


## पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते चांदी- सोन्याच्या १०८ किलो वजनाच्या गणराजाची आरती

जालना । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील चांदी -सोन्याचा १०८ किलो वजनाच्या अनोखा गणेश मूर्तीची आरती पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या हस्ते करण्यात आली.

गणेश मंडळाच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त खास श्री भक्तांसाठी हरियाणा राज्यातील सुनील-अनिल तिलकधारी प्रस्तुत शंभर कलावंतांच्या संचास पाचरण केले असून पहिल्याच दिवशी या कलावंतांनी श्री गणेश, प्रभू श्रीराम, बजरंगबली, महादेव, कालीकलकत्ते वाली माता, तिरुपती बालाजी यांची विविध रूपे आणि भक्ती गीतांवर चित्तथरारक नृत्य सादर करून भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही भाविकांनी पहिल्याच दिवशी अनोखा देखावा पाहण्यासाठी रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली होती. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अजय (जगदीश) भरतिया यांनी पोलीस प्रशासनाने मंडळास नेहमी सहकार्य के ले असून, त्यांच्या सुरक्षेमुळे माता - भगिनी मोठ्या प्रमाणात देखावा पाहण्यासाठी येथे येत असल्याचे नमूद केले. या वेळी मंडळाचे सदस्य व श्री भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान, आगामी चार दिवस मंडळातर्फे प्रतीवर्षी प्रमाणे यंदाही महाप्रसाद आणि हरियाणा राज्यातील सुनील -अनिल तिलकधारी यांच्या शंभर कलावंतांचे पथक सजीव धार्मिक देखावे सादर करणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी गणेशोत्सवाच्या सर्व जालनेकरांना शुभेच्छा देत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून सामाजिक ऐक्य राखत साजरा करावा आणि पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन केले. अनोखा गणेश मंडळांनी धार्मिक व सांस्कृतिक वातावरण उच्च पातळीवर नेल्याचे बंसल यांनी नमूद केले.



## खर्डा पोलीस ठाण्यातील गणेशाचे विसर्जन

खर्डा । प्रतिनिधी

खर्डा पोलीस ठाण्यामध्ये पोलिसांनी बसवलेल्या गणपतीचे मोठ्या उत्साहात विसर्जन करण्यात आले. यावेळी पोलिस कर्मचाऱ्यांनी गणेशोत्सवाचा भरपूर आनंद घेतला.

खर्डा पोलीस ठाणे येथे सर्व पोलिसांच्या वतीने गणेशोत्सव साजरा करत गणेशाची प्रतिष्ठापणा केली होती. याठिकाणी दररोज पोलीस अधिकारी, कर्मचारी, यांच्या हस्ते आरती करण्यात आली. या गणेशाचे विसर्जन करण्यात आले. गणेशमूर्तीची सजवलेल्या पोलिस गाडीतून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पोलिसांनी फेटे बांधत पारंपारिक वाद्याच्या तालावर मिरवणुकीमध्ये नाचण्याचा आनंद घेतला. सर्व पोलिसांनस भगवा कुडता, फेटे बांधलेले असल्याने आणि शिस्तबद्ध पद्धतीने



मिरवणूक निघाल्याने मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. सध्या सर्वत्र गणरायाचा विसर्जन सोहळा सुरु होणार असल्याने पोलिसांना बंदोबस्तावर हजर रहावे लागणार आहे. त्यामुळे श्री गणेशाचे पोलिसांकडून विसर्जन करण्यात आले. खर्डा पोलीस ठाण्याच्या वतीने शासकीय कार्यालयातील कर्मचारी, पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, पत्रकार यांना महाप्रसादाचे आयोजन यावेळी केले होते. यावेळी कोणत्याही उत्सवाचा आनंद आम्हाला घेता येत नसतो. मात्र गणेशोत्सवाचा आनंद साजरा करता येत असल्याचे, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम पोलिस कर्मचाऱ्यांना नवी ऊर्जा देत असल्याचे मत सहाय्यक पोलिस निरीक्षक उज्ज्वलसिंह राजपूत यांनी व्यक्त केले.

## जामखेड मधील त्या जिर्ण पुलाचा प्रश्न गंभीर

### शालेय विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या जीवितास धोका; मनसेकडून तातडीने दुरुस्तीची मागणी

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड शहर नगर परिषद क्षेत्रातील मोरे वस्ती परिसरातील पुलाची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून, नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पुलावरून दररोज शालेय विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करतात. पुलाच्या दोन्ही बाजूंना भेगा पडल्या असून लोखंडी सळई बाहेर आलेल्या दिसतात. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे याची तातडीने दुरूस्ती करावी, अशी मागणी मनसेच्यावतीने नगर पालिकेत निवेदन देऊन करण्यात आली आहे.

यापुर्वी जून २०२३ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पुल दुरुस्तीबाबत निवेदन देण्यात आले होते. मात्र





आजतागायत त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नगर परिषद जामखेड मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, तातडीने पुल दुरुस्तीची कामे सुरू करावीत, अशी मागणी करण्यात आली. जर काम वेळेत केले नाही तर मनसे तीव्र आंदोलन करेल असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. हे निवेदन मनसेचे तालुकाध्यक्ष प्रदीप टापरे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी तालुका उपाध्यक्ष सनी सदाफुले, शहर उपाध्यक्ष अनिल पाटील, बंटी पाटील, आकाश साठे, गणेश जोशी, अतुल भोंडवे, बापू आरेकर उपस्थित होते.

पुलाची दुरुस्ती ही केवळ विकासाची बाब नसून जनतेच्या जीवनाशी थेट संबंधित आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांसह रस्त्यावर उतरून आंदोलन छेडावे लागेल,

– प्रदिप टापरे, मनसे अध्यक्ष.

## अथर्वशीर्ष पठणातून सकारात्मक ऊर्जा निर्माण होते -पाटांगणकर

### बीडमध्ये के.एस.के.महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण

बीड। प्रतिनिधी

अथर्वशीर्षाच्या उच्चाराने वातावरणामध्ये एक वेगळीच सकारात्मक भक्तीमय ऊर्जा निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून व आपली भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन होण्याकरिता असे उपक्रम आवश्यक आहेत, असे प्रतिपादन ह.भ.प.विनायक पाटांगणकर यांनी केले. बीड येथील के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण गुरुवारी (दि.४) सकाळी ११ वाजता पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे अतिथी म्हणून ह.भ.प.विनायक महाराज पाटांगणकर हे बोलत होते. याप्रसंगी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर, बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ.दीपाताई क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

बालरंगभूमी परिषद शाखा बीड तर्फे गणेश उत्सवाचे औचित्य साधून लहान मुलांवर उत्तम संस्कार व्हावेत या उद्देशाने अथर्वशीर्ष पठणाचा




उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. निलमताई शिर्के-सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे. कार्यक्रमाची सुरुवात देवकी नामदेव साळुंके व स्वराली नामदेव साळुंके यांच्या पंचरत्न स्तोत्र गायनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. पठणानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. अथर्वशीर्ष पठणासाठी मार्गदर्शक म्हणून गौरी गणेश कुलकर्णी, जान्हवी गिरीश देशपांडे, प्रा.अनिता वैद्य व संस्कृत अध्यापिका खके यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव साळुंके यांनी केले, तर आभार डॉ.अनिता शिंदे यांनी मानले. यावेळी दुष्यंता रामटेके, अनुराधा चिंचोलकर, अमित गाडे, दीपक जमधाडे, विजय राख, राहुल सोनवणे, सुरेश थोरात, इंद्रजीत भांगे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### विविध शाळेतील २७५ विद्यार्थ्यांचा सहभाग

बीड शहरातील संस्कार विद्यालय, चंपावती विद्यालय, सावरकर विद्यालय, यशवंत विद्यालय, रामतीर्थ कुंड विद्यालय, सरस्वती विद्यालय तेलगाव, छत्रपती शाहू विद्यालय, आयकॉन इंग्लिश स्कूल, नवगण विद्यालय, गजानन विद्यालय राजुरी आदी शाळांमधील सुमारे २७५ विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

## रानडुकरांनी लिंबागणेश परीसरातील शेतकऱ्यांची उडविली झोप



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश, पिंपरनई, पोखरी (घाट), सोमनाथवाडी, इमुळुकवाडी व मसेवाडी या गावांतील शेतकऱ्यांचे पिके रानडुकरांच्या हल्ल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असून शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. आधीच निसर्गाच्या अवकृपेमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या संकटात आणखी भर पडली आहे. वनविभागाने रानडुकरांचा बंदोबस्त करून नुकसानभरपाई द्यावी, अशी ठाम मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

आधीच अतिवृष्टीमुळे पिके वाया गेली आहेत. काबाडकष्टाने उभं केलेलं पीक रानडुकरांमुळे उद्ध्वस्त होत आहे. वनविभागाने याचा तातडीने बंदोबस्त करावा आणि आम्हाला नुकसान भरपाई द्यावी,'' अशी मागणी प्रमोद निर्मळ, बाबासाहेब निर्मळ, दिनेश आवसरे, सुदाम तागड, नामदेव आवसरे, संदिपान वायभट, देवबा गव्हाणे आदी शेतकऱ्यांनी केली आहे. डॉ. श्यामाप्रसाद जन-वन-विकास योजनेत केवळ जंगलालगतच्या गावांना सौरकुंपणाचा लाभ दिला जातो. मात्र रानडुकरं, मोर, हरणे यांचा त्रास जंगलालगतच्या गावापुरता मर्यादित नसून अनेक शेतकरी गावांमध्ये होत आहे. त्यामुळे ही योजना सर्व गावांसाठी लागू करण्यात यावी,'' अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# जनावरे चोरणारी टोळी पकडली; तीन गुन्हे उघडकीस

## पाच जनावरे व दोन चारचाकी वाहने हस्तगत; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षकांनी बीड जिल्हयामध्ये जनावरे चोरणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले होते. दिनांक ३ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारामार्फत माहीती मिळाली की, नितीन संजय जाधव रा गांधीनगर बीड याने चारचाकी वाहनांमध्ये जनावरे चोरुन आनल्या असुन त्याचे घरी बांधल्या आहेत. सध्या नितीन घरात आहे अशी माहीती मिळाल्यावरुन ताबडतोब पथकाने सदरील ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेवुन चोरी केलेल्या तीन जनावरे हस्तगत केल्या. या बाबत विचारपुस



केली असता त्याने कुंभारवाडी परीसरातुन जनावरे चोरल्याचे कबुल केले आहे.

त्याचे कडुन शेळया चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.त्यास पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिरुर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.आरौपीने

पोलीस ठाणे शिरुर गु.र.नं २५५/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस, गु.र.नं २५६/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस , गु.र.नं २५७/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस असे गुन्हे दाखल आहेत. तसेच दिपक चंदु गुंजाळ रा. गांधीनगर यास देखील गांधीनगर येथुन ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन दोन जनावरे व चोरी करण्यासाठी वापरात आनलेले वाहन असे जप्त करुन त्याचे कडुन खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आनले आहेत.

पोलीस ठाणे गेवराई गु.र.नं ५१४/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस

वरील दोन्ही प्रकरणात एकुण चार आरोपी निष्पन्न झाले असुन पैकी दोन आरोपी अटक करण्यात आले आहेत. दोन फरार आरोपींचा शोध पोलीस ठाणे शिरुर व गेवराई हे घेत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने एकुण चार जनावरे चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन चारही गुन्हयातील चोरीस गेलेली जनावरे व चोरी करण्यासाठी वापरात आणलेली वाहने असा एकुण ८,७९,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे गेवराई यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, आशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे, महीला पोलीस हवालदार स्वाती मुंडे चालक सिध्देश्वर मांजरे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी मिळुन केली आहे.

# विसर्जन जवळ आले तरी खड्डे मात्र तसेच

पाटोदा । प्रतिनिधी

गणेश उत्सवा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या पाटोदा पोलीस स्टेशनच्या शांतता समितीच्या बैठकीत प्रशासनाला मंडळांनी विविध सूचना केल्या व प्रशासनाने ही नागरिकांना शिस्त व नियम पाळण्याचे आवाहन केले होते. मात्र विसर्जन



मिरवणूक अगदी जवळ आली असतानाही पाटोदा शहरातील मांजरा नदी पुलावरील मोठे खड्डे बुजवण्यात आली नाही याकडे सर्वाच लक्ष वेधले जात आहे. मांजरा नदी पुलावरून हजारो गणेशभक्त विसर्जन मिरवणुकीतून जाणार असून, या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. नागरिकांनी अनेक वेळा ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली तरी अद्याप कोणतीही दखल घेतली गेलेली नाही.सुरक्षा व वाहतुकीच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर असून, विसर्जन मिरवणुकीच्या आदल्या दिवशी तरी संबंधित विभागाने तातडीने खड्डे बुजवून दुरुस्ती करावी, अशी मागणी सर्वत्र होत आहे. अन्यथा कुठल्याही अपघाताची जबाबदारी प्रशासनावर राहील असा इशारा गणेश भक्तांनी दिला आहे.

# बालिकेवरील अत्याचार करणाऱ्या नराधमाला फासावर चढवा

## अंबाजोगाईच्या मुस्लिम समाजाचे उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**परळी वैजनाथ रेल्वे स्थानक परिसरात चार वर्षीय चिमुकलीवर अमानुष बलात्काराची घटना घडल्याने संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील नराधमास फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी गुरुवारी (दि.०४) समस्त मुस्लीम समाज अंबाजोगाईतर्फे उपजिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.**

दिनांक ३१ ऑगस्ट रोजी रोजगाराच्या शोधात परळी रेल्वे स्टेशन परिसरात येऊन दमून झोपलेल्या दाम्पत्याच्या चार वर्षीय मुलीवर परिसरामध्ये वावरणाऱ्या नराधमाने पाशवी अत्याचार केला होता. या घटनेने समाजमन संतप्त झाले असून, ''संपूर्ण मानवजातीला काळिमा फासणारा हा प्रकार आहे. त्यामुळे आरोपीस कठोरात कठोर शिक्षा दिली जावी आणि त्याला फाशीच देण्यात यावी,'' अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यासोबतच परळी तसेच राज्यातील रेल्वे स्टेशन परिसर, सार्वजनिक ठिकाणे व कार्यालयीन क्षेत्रात संशयित हालचाल करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांनी सतत लक्ष ठेवावे, मोकाट फिरणाऱ्यांवर प्रतिबंध घालावा आणि तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणीही मुस्लीम समाजाने केली आहे. समाजाने एकत्रितपणे उपविभागीय कार्यालयात येऊन हे निवेदन उपजिल्हाधिकाऱ्यांना दिले.

# समृद्ध गाव करण्यासाठी ग्रामपंचायतींना मोठी संधी - आ. प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने मार्च २०२५ मध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याची घोषणा करण्यात आली असून या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हा परिषदांची निवड करून त्यांना तालुका,जिल्हा, महसुल विभाग व राज्य स्तरावरील प्रोत्साहनपर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

या अभियानाचा कालावधी दि १७



सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा निश्चित करण्यात आलेला असून या कालावधीत सर्व ग्रामपंचायतींनी आपल्या गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्रिय सहभाग नोंदविणे अपेक्षित आहे.ग्रामविकास, स्वच्छता, हरितीकरण, स्वयंपूर्णता व आदर्श ग्रामनिर्मिती या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हे अभियान एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार असून प्रत्येक ग्रामपंचायतीने ही संधी साधून आपल्या गावाला समृद्ध गाव करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन आ.प्रकाश सोळंके यांनी यावेळी केले आहे.

# खोक्या उर्फ सतीश भोसले याचा दुसऱ्यांदा जमीन अर्ज फेटाळला


शिरूर । प्रतिनिधी

कासार तालुक्यातील दहशत निर्माण करण्यासह हरणाची शिकार करण्याचा आरोप असलेला खोक्या भोसले यांनी दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ शिरूर तालुक्यातील बावी येथे ढाकणे कुटुंबावरील हल्ला केल्याप्रकरणी सतीश भोसले उर्फ खोक्या याच्यावर शिरूर पोलीस स्टेशन येथे बीएनएस १०९, ११५ (२) ,११८(१), १८९(२),१९० व शस्त्र अधिनियम ४,२५ नुसार दिनांक ०६/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल झाला. शिरूर पोलीसानी तपास पूर्ण करून दोषारोप मा.न्यायालयात दाखल केले. त्या नंतर



दिनांक १३/ ०६/ २०२५ रोजी माननीय मुख्य सत्र न्यायालय बीड येथे जमिनीचा अर्ज दाखल केला.या प्रकरणी दोन्ही बाजूने युक्तिवाद माननीय न्यायालयाने ऐकून घेतला फिर्यादी कडून एडवोकेट किशोर खेडकर, एडवोकेट अनिल बारगजे, एडवोकेट रामराव बडे एडवोकेट बी. एन. झिने, एडवोकेट विलास ढाकणे ,ऍडव्होकेट सुनील आंधळे ,अडवोकेट बालाजी विघ्ने यांनी काम पाहिले. फिर्यादीची योग्य कायदेशीर बाजू मा. न्यायालयापुढे सादर केल्यामुळे आज रोजी माननीय मुख्य सत्र न्यायालय बीड यांनी दि ०२/०९/२०२५ रोजी खोक्या उर्फ सतीश भोसले याचा दुसराही जामीन अर्ज फेटाळला.

# महासांगवी तलावाला मोठमोठ्या झाडांमुळे तडे जाण्याची शक्यता





पाटोदा । प्रतिनिधी

महासांगवी तलावावर पाटोदा शहराची आणी महासांगवी व कवडवाडी या गावाची पाण्याची उपजीविका भागते. तसेच सध्या परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात पडत असतो यावर्षी पाटोदा तालुक्यात भरपूर पाऊस झाला असून सर्व तळे फुल झालेली आहेत महासांगवी तलाव सांडवेहून पाणी पडले असून. तलावाच्या भिंतीवर मोठी मोठी झाडे. ◀◀ पान २ वर

# ईद ए मिलादून्नबीची मिरवणूक ८ सप्टेंबरला गणेश उत्सवामुळे मुस्लिम समाजाचा निर्णय

किल्लेधारूर । प्रतिनिधी

दि.५ सप्टेंबर रोजी देशभर ईद ए मिलादुन्नबी साजरी होत आहे. परंतू गणेश उत्सव सुरु असल्यामुळे दि.५ रोजी ईद ए मिलाद निमित्त निघणारी ध्वज मिरवणूक दि.८ सोमवारी काढण्याचा निर्णय धारूर येथील ईद ए मिलाद सिरत कमिटीच्या वतीने घेण्यात आला.



इस्लामचे शेवटचे प्रेषीत महंमद पैगंबर (स) यांची जयंती जगभर उत्साहात साजरी होते. प्रतिवर्षी धारूर शहरातही मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रम घेवून ईद ए मिलाद साजरी केली जाते. यावर्षीही भारतात दि.५ सप्टेंबर रोजी पैगंबर (स) जयंती साजरी होत आहे. गतवर्षीप्रमाणेच यावर्षीही सध्या गणेश उत्सव सुरु असून दि.५ व ६ सप्टेंबर रोजी धारूर शहरात मंडळाकडून गणेश विसर्जन होणार आहे. यामुळे जयंती निमित्त निघणारी ध्वज मिरवणूक दोनदिवसानंतर दि.८ सोमवार रोजी काढण्याचा निर्णय पोलिस प्रशासनाच्या विनंतीवरुन ईद ए मिलाद ◀◀ पान २ वर

# डॉ. शोएब हाश्मी यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हा संघटक तथा एशियन हॉस्पिटलचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. शोएब हाश्मी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्यासह पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

डॉ. हाश्मी यांच्या वतीने विविध अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि अंध व अपंग मुलींचे वसतिगृह ◀◀ पान २ वर


# अंबाजोगाईच्या तरुणाने बनवली सायबर बंधू वेबसाइट

## आधार, पॅन, मोबाईलच्या गैरवापराला बसणार आळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजातील वाढत्या सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण होऊन ती कुठेही उघड न होण्यासाठी अंबाजोगाई येथील एका तरुणाने आपल्या अभियांत्रिकी शैक्षणिक कौशल्याचा फायदा व आधार घेत त्याने एक अभिनव पाऊल उचलले आहे. सौरव बापूदेव कांबळे या स्थानिक तथा ग्रामीण भागातील तरुणाने सायबर बंधू डॉट कॉम नावाची एक वेबसाइट विकसित केली आहे.या वेबसाईटद्वारे कोणत्याही आधार कार्ड, पॅन कार्ड आणि मोबाईल नंबरचा होणारा गैरवापर थांबऊन त्यामधील सर्व डेटा वैयक्तिक रित्या सुरक्षित ठेवण्यात मदत मिळू शकते.

अंबाजोगाई शहरातील नागझरी



परिसरातील शिक्षक बापूदेव कांबळे यांचा मुलगा चि सौरव कांबळे याने ही वेबसाइट तयार केली आहे. सौरभ सध्या एन आय टी कॉलेज जालंधर ( पंजाब ) येथे बी टेक चे शिक्षण घेत आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण हे अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले आहे.

आजच्या डिजिटल युगात अनेकांच्या आधार, पॅन किंवा मोबाईल नंबरचा गैरवापर केला जातो, ज्यामुळे मोठे आर्थिक आणि कायदेशीर नुकसान होऊ शकते. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन, सौरवने ही वेबसाइट तयार केली आहे. या वेबसाइटच्या माध्यमातून नागरिक आपला आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा मोबाईल नंबरचा वापर कोणी, कधी आणि कशासाठी केला आहे याची माहिती मिळवू शकतात. याद्वारे आपल्या माहितीचा गैरवापर होतो आहे का हे वेळीच समजून घेणे शक्य होणार आहे. सायबर गुन्हेगारी रोखण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे आणि स्तुत्य पाऊल मानले जात आहे. सौरवच्या या संशोधनामुळे अनेक नागरिकांची फसवण

# विद्यार्थ्यांनीच निवडले रोटरीचे राष्ट्र शिल्पकार पुरस्कार विजेते शिक्षक

बीड । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने देण्यात येणारे राष्ट्रशिल्पकार पुरस्कार विजेते शिक्षकांची निवड यंदा विद्यार्थ्यांनी केली आहे. दर वर्षी शिक्षकदिना निमित्त शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय आणि सामाजिकदृष्टया प्रेरणादायी शिक्षकांना रोटरी क्लब च्या वतीने गौरवण्यात येते यावर्षी दि ५ सप्टेंबर शिक्षक दिना निमित्त ६ शिक्षकांना या पुरस्कारासाठी निवडले आहे.

महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग अ जिल्हा परिषद बीड पदाधिकारी डॉ विक्रम सारूख यांच्या हस्ते आणि रोटरीचे माजी प्रांतपाल रो हरीश मोटवाणी तसेच सहाय्यक प्रांतपाल रो प्रवीण देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल अन्विताच्या दरबार हॉलमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. यावर्षी भगवान विद्यालयाचे देविदास डोळे, कळसंबर येथील नूतन कुंडकेश्वर विद्यालयाचे आर. डी. शेळके, शिवाजी विद्यालयाच्या अश्विनी मस्के, कंकालेश्वर विद्यालयाचे व्ही. बी. जाधव, ◀◀ पान २ वर

# टेंबे चरणी पावणेदोन किलो चांदीचे दागिने अर्पण

## भक्तांची लक्षणीय गर्दी; दररोज महाप्रसाद, भाविकांनी वही, पेन देण्याचे आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगावचा महाराजा म्हणुन ओळख असलेल्या टेंबे गणपतीची स्थापना उत्साहात करण्यात आली असुन पहिल्याच दिवशी भाविकांनी पावणेदोन किलो चांदीचे दागिने श्रीचरणी अर्पण केले आहेत तर भक्तांची लक्षणीय उपस्थिती दिसुन येत आहे. दररोज महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे तर भाविकांनी हार, तुरे न आणता श्रीचरणी वही, पेन अर्पण करावेत असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष अनंतशास्त्री जोशी यांनी केले आहे.



गणेशोत्सव काळात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता महिलांकरीता स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे तर तीन दिवसीय गणेश यागास सुरूवात झाली आहे. गाणगापुर येथील दत्त मंदिराचा व तिरूपात बालाजीचा आकर्षक देखावा मंडळाच्या वतीने साकारण्यात आला आहे. त्याचबरोबर पाच दिवस महिलांचा भजनाचा कार्यक्रम, सामूहिक अथर्वशीर्ष पठण, पौर्णिमेला दिपोत्सव, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर आदी उपक्रमांची रेलचेल गणेशोत्सव काळात असणार आहे. राज्यासह मराठवाड्यातुन टेंबे गणपतीच्या दर्शनाला भाविकांची मोठी रिघ आहे. स्थापनेच्या पहिल्या दिवशी गणरायाला पावणे दोन किलो चांदीचे दागिने श्रीचरणी अर्पण करण्यात आले आहेत. यामुळे मुर्तीची अधिक शोभा वाढली आहे. यामध्ये भारती व्दारकादास मुंदडा यांचे वतीने सोंड, डॉ. आर. जी. बजाज यांचे वतीने हात, सचिन बजाज, गिरीष बजाज यांचे वतीने कान तर हातातील कंगन सचिन श्रीकांत रूद्रवार यांचे वतीने देण्यात आले तर चांदीचे मोदक, दुर्वा देखिल श्रीचरणी अर्पण केल्या आहेत. भाविकांनी हार, तुरे न आणता श्रीचरणी वही, पेन अर्पण करावेत असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष अनंतशास्त्री जोशी यांनी केले आहे.









This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email- rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आदर्श शिक्षकांचा गौरव

## बालवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळांतील २३ शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन केला सन्मान

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून २३ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आमदार अमित गोरखे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात हा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहाय्यक प्रशासन अधिकारी रजिया खान यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आमदार अमित गोरखे म्हणाले, शिक्षक हा समाजातील महत्त्वाचा पैलू आहे. महापालिकेचा शिक्षण विभाग आणि शाळा अतिशय उत्तम कार्य करीत आहेत. मी देखील महापालिकेच्या शाळेचा विद्यार्थी असून माझ्या जडणघडणीत शिक्षकांचा मोठा वाटा आहे, असेही ते म्हणाले.अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, शाळा म्हणजे मुलांच्या भविष्यासाठीचा भक्कम पाया आहे. त्या पायाला मजबूत करण्याचं कार्य आपले शिक्षक निष्ठा, समर्पण आणि प्रेमाने करीत आहेत. पर्यवेक्षक आणि शिक्षक यांचा एकत्रित प्रयत्न हीच आपल्या महापालिका शाळांची खरी ताकद आहे. शिक्षकांच्या या योगदानामुळे महापालिका अधिक गुणवत्तापूर्ण, सक्षम आणि आदर्शवत शाळा उभारण्याच्या दिशेने सातत्याने प्रगती करत आहे.

सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांनी सांगितले की, महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देत नाहीत, तर त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे महत्त्वाचे कार्यही करतात. शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे आपल्या महापालिकेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावत आहे. शिक्षण विभाग सातत्याने गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्नशील असून, या प्रवासात शिक्षकांचा सहभाग आणि त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी केले. सूत्रसंचालन चारोशीला फुगे यांनी केले, तर आभार गणेश लिंगडे यांनी मानले.




आयुक्तांनी व्हिडिओ संदेशाद्वारे दिल्या शुभेच्छा

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचा यावेळी शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा देणारा व्हिडिओ संदेश दाखवण्यात आला. यामध्ये आयुक्त सिंह यांनी शुभेच्छा देताना म्हटले आहे की, शिक्षक म्हणजे फक्त ज्ञान देणारे नाहीत, तर मुलांच्या स्वप्नांना आकार देणारे खरे शिल्पकार आहेत. प्रत्येक मुलाच्या यशामागे त्याच्या शिक्षकाची निष्ठा, कष्ट आणि ममत्व दडलेलं असतं. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांनी गेल्या काही वर्षांत केलेली प्रगती ही शिक्षक आणि पालक यांच्या मेहनतीमुळेच शक्य झाली आहे. शाळा म्हणजे केवळ शिक्षणाचं केंद्र नव्हे, तर भावी पिढी घडविण्याचं मंदिर आहे. आपल्या शाळा पालकांना अभिमानाने निवडाव्याशा वाटाव्यात हा आपला ध्यास असून, त्या दिशेने शिक्षकांचा वाटा सर्वांत मोठा आहे.'

**आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आलेले शिक्षक**

शिक्षक दिनानिमित्त विशेष कामगिरीबद्दल महापालिकेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेल्या शिक्षकांमध्ये बालवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील शिक्षकांचा समावेश होता. यामध्ये क्रीडा शिक्षक भाऊसाहेब व्यंकट खैरे, पीसीएमसी पब्लिक स्कूल जाधववाडी कन्या प्राथमिकचे जितेंद्र कराड आणि आबासाहेब पाळवंदे यांना विशेष पुरस्कार देण्यात आला.

तर, थेरगाव येथील बालवाडी विभागातील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेच्या सविता मांडेकर, यशवंतराव चव्हाण उर्दू शाळा थेरगावच्या नसरीन बानो मोहम्मद सुलतान आणि सावित्रीबाई फुले शाळा मोशीच्या वैशाली साकोरे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला.

प्राथमिक शाळांमधून मोशी मुले येथील पीसीएमसी पब्लिक स्कूलच्या प्रियंका गावडे, सुभांगी भोंडवे, दिघी कन्या पब्लिक स्कूलचे प्रदीप घुटे, भोसरी कन्या पब्लिक स्कूलच्या स्वाती शिंदे, मोशी कन्या पब्लिक स्कूलच्या कांचन घोडे, चिखली कन्या पब्लिक स्कूलच्या विश्वलता मोरे, कुदळवाडी पब्लिक स्कूलचे मारुती खामकर, पिंपळे गुरव पब्लिक स्कूलच्या चित्रा शेवकरी आणि थेरगाव उर्दू पब्लिक स्कूलच्या उस्ताद बिबिहाज्रा जंगबहादूर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. माध्यमिक शाळांमधून पिंपळे गुरव येथील पीसीएमसी पब्लिक स्कूलच्या प्रिया नांगरे, पिंपळे सौदागर येथील पीसीएमसी पब्लिक स्कूलच्या वैशाली मामुल्वार, राजश्री कांबळे आणि क्षितिज शिंदे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

खासगी शाळांमधून निगडी येथील विलू पूनावाला प्राथमिक शाळेच्या मनिषा कदम आणि श्री फत्तेचंद जैन विद्यालय व ज्युनियर कॉलेज, चिंचवडच्या अंजू सोनावणे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला.

तसेच, पिंपरी चिंचवड महापालिका संचालित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल व ज्युनियर कॉलेजचे सखाराम पितळे आणि काळेवाडी येथील आकांक्षा संचालित कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम शाळेच्या मेघा कानडे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

---

# विसर्जनासाठी कडेकोट बंदोबस्त मार्गावर सीसीटीव्ही, वॉच टॉवर्स

पुणे । प्रतिनिधी

विसर्जन मिरवणुक सुरळीत पार पाडण्यासाठी अतीवरिष्ठ, वरिष्ठांसह, अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड, राज्य राखीव पोलीस दलासह तब्बल आठ हजारांहून अधिक कर्मचारी तैनात राहणार आहेत.पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार आणि सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा तसेच विशेष शाखेचे उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे नियोजन केले आहे.

मिरवणूक शांततेत, सुरक्षित पार पाडणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. नागरिकांनीही सहकार्य करावे,' असे आवाहन पोलिसांनी केले आहे. विसर्जन मिरवणुकीत विशेषतः मानाच्या गणेश मंडळांच्या मिरवणुकीच्या मार्गांवर



पोलिसांचा खडा पहारा असणार असून सीसीटीव्ही कॅमेर्‍यांचा सतत वॉच असेल. गर्दीच्या ठिकाणी मदत केंद्रे, वॉच टॉवर आणि चौकाचौकात निरीक्षण मनोरे असतील.

चेन चोरी, खिसेकापू किंवा जबरी चोरीसारखे गुन्हे रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलिसांना नियुक्त केले आहे. यावेळी लेझर लाईट्स किंवा घातक दिव्यांच्या वापरास मनाई आहे. नागरिकांच्या सोयीसाठी विविध ठिकाणी मदत केंद्रे उभारण्यात येणार असून वैद्यकीय मदतीसाठीही स्वतंत्र व्यवस्था केली जाणार आहे. विसर्जनाची सांगता होईपर्यंत शहर व उपनगरांमध्ये सतत पोलीस गस्त राहणार आहे.

असा असेल बंदोबस्त...

- –अप्पर पोलीस आयुक्त ४
- –पोलीस उपायुक्त १२
- –सहायक पोलीस आयुक्त ३३
- –पोलीस निरीक्षक १४१
- –सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक ५५८–कर्मचारी ६४४३
- –होमगार्ड. ९७२

---

# गणेश विसर्जनानंतर मुर्तींचे छायाचित्रण व प्रसारणास सक्त मनाई !

पुणे । प्रतिनिधी

गणेश विसर्जनानंतर कृत्रिम तलाव, हौद, नैसर्गिक तलाव, नदी, कॅनॉल आदी जलस्त्रोतामधील तरंगत्या किंवा अर्धवट तरंगत्या तसेच संकलित केलेल्या मुर्त्यांचे छायाचित्रण करून धार्मिक भावना दुखावतील व सार्वजनिक शांतता भंग पावेल अशी छायाचित्रे अथवा चलचित्रे समाजमाध्यमांवर प्रकाशित किंवा प्रसारित करण्यास मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.



भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये हा मनाई आदेश पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर व कार्यकारी दंडाधिकारी डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी काढला आहे. विसर्जनानंतर गणेश मुर्तींचे छायाचित्रण, त्यांचे प्रकाशन व प्रसारण यावर बंदी घालण्यात आली असून आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अन्वये दंडनीय कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद केले आहे.

हा आदेश दिनांक ०४ सप्टेंबर २०२५ रोजी ००.०१ वाजल्यापासून ते दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी २४.०० वाजेपर्यंत पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये अंमलात राहील. सदर आदेश सार्वजनिक ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत असून स्थानिक वृत्तपत्रांद्वारेही प्रसारित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

---

# श्री गणनायक रथातून निघणार 'दगडूशेठ' गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३३ व्या वर्षानिमित्त आयोजित गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक अनंत चतुर्दशीला शनिवार, दिनांक ६ सप्टेंबर रोजी थाटात निघणार आहे. यंदा श्री गणनायक रथामध्ये दगडूशेठ चे गणपती बाप्पा विराजमान होणार असून आकर्षक विद्युतरोषणाईने हा रथ उजळून निघणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

सलग तिस–या वर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दुपारी ४ वाजता बेलबाग चौकातून मिरवणुकीमध्ये सहभागी होणार आहे. यंदाची प्रतिकृती असलेल्या केरळमधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराच्या विषयाप्रमाणे सांगता मिरवणूक रथाची मांडणी करण्यात आली आहे. दक्षिण भारतीय शैलीतील रथाची निर्मीती करण्यात आली आहे.

दक्षिण भारतात जसा लाकडाचा रथ साकारला जातो, तसा हा रथ तयार करण्यात आला आहे. रथावर ज्याप्रमाणे सप्तरंगांची उधळण केली जाते, तशीच इथेही करण्यात आली आहे. श्री पद्मनाभ स्वामी हे श्री विष्णूंचे मंदिर असल्यामुळे रथावर ४ गरुडमूर्ती लावण्यात आल्या




आहेत. त्यापैकी २ मूर्ती ६ फूट उंचीच्या तर २ मूर्ती ३ फूट उंचीच्या आहेत. रथाचा आकार १६ बाय १६ फूट असून उंची २४ फूट इतकी आहे. रथावर झुंबरे, एलईडी व पार लाईटचे फोकस लावण्यात येणार आहेत. कलादिग्दर्शक विनायक रासकर यांनी हा रथ साकारला आहे.

सांगता मिरवणुकीबाबत माहिती देताना सुनील रासने म्हणाले, मिरवणुकीत मानवसेवा रथ व त्यामध्ये सनई–चौघडा अग्रभागी असणार आहे. मिरवणुकीत स्वरूपवर्धिनीचे पथक, केरळचे चेंदा मेलम पथक असा लवाजमा असेल. तसेच पुरुष भाविकांसह महिला गणेशभक्त देखील मोठया संख्येने सहभागी होणार आहेत.


---

# पिंपरी चिंचवडमध्ये गणेशोत्सवानिमित्त प्रमुख चौकांमध्ये महापालिकेच्या वतीने करण्यात आले सुशोभीकरण

पिंपरी । प्रतिनिधी

राज्य शासनाने यावर्षी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, त्यानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण केले आहे.

यामध्ये प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चौक, शगुन चौक, चंद्रमणी कॉलनी सांगवी, तसेच पद्मभूषण वसंतदादा पाटील स्मृतीस्थळ चौक या ठिकाणांचा समावेश आहे. राज्य शासनाच्या



निर्देशानुसार गणेशोत्सव काळात शासकीय योजना, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि सांस्कृतिक कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून चौकांचे सुशोभीकरण करण्यात आले असून, येथे आकर्षक सजावट व जनजागृतीमधून नागरिकांना विविध माहिती उपलब्ध करून दिली गेली आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने पिंपरी येथील शगुन चौक तसेच जुनी सांगवी येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील स्मृतीस्थळ चौक येथे 'ऑपरेशन सिंदूर' या शौर्यगाथेवर आधारित सजावट करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती चिंचवड गावातील चौकात उभारण्यात आली आहे. सांगवीतील चंद्रमणी कॉलनी चौकात युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात सामाविष्ट झालेल्या महाराष्ट्रातील ११ व तामिळनाडू येथील १ अशा १२ किल्ल्यांची माहिती देत सजावट करण्यात आली आहे. तर, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चौक येथे रायगड किल्ल्याची प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख चौकांमध्ये करण्यात आलेली ही आकर्षक सजावट आणि ऐतिहासिक विषयांवर आधारित सुशोभीकरण पाहण्यासाठी नागरिकांची मोठ्या संख्येने गर्दी होत आहे.

---

# पिंपरी चिंचवड पोलीसांची अवैध शस्त्रांविरुध्द विशेष मोहिम; ५० अवैध अग्नीशस्त्रे जप्त

पुणे । प्रतिनिधी

मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री.विनय कुमार चौबे यांनी दिनांक १३/०८/२०२५ ते दिनांक ०२/०९/२०२५ रोजी पर्यंत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व पोलीस स्टेशन व गुन्हे शाखा यांना अवैध अग्निशस्त्रे व धारधार घातक शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यासाठी

विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते.

सदर मोहिमे दरम्यान पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व पोलीस स्टेशन व

सर्व गुन्हे शाखा यांनी अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्यांवर इसमांवर कारवाई करुन एकुण ४० गुन्हे दाखल करुन ४५ आरोपींना अटक केलेली आहे. त्यांचे ताब्यातुन एकुण ५०



अग्निशस्त्रे ( पिस्टल ) व ७९ जिवंतकाडतुसे जप्त करण्यात आले आहेत. तसेच धारधार घातक शस्त्रे बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करुन ९४ गुन्हे दाखल करुन ६६ आरोपी यांना अटक करुन त्यांचे ताब्यातुन (कोयता – ९१, तलवार – १२, पालघन–०४, सुरा/चाकु / गुप्ती – ०६) असे एकुण ११६ घातक धारधार शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत. सदर मोहिमेमध्ये सोशल मिडीयाद्वारे घातक धारदार शस्त्रांसोबत फोटो व रिल्स प्रसारीत करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवुन कारवाई करण्यात आलेली आहे व ती यापुढे देखील सातत्याने चालु राहणार आहे.

या मोहिमेअंतर्गत विशेषतः गुन्हे शाखा युनिट –४ चे पथकाने मोक्यातुन सुटलेला /जेल रिलीज आरोपी नामे पवन देवेंद्र बनेटी वय २४ वर्षे रा. राजीव गांधी झोपडपट्टी, पिंपळे गुरव, सांगवी पुणे याच्या ताब्यातुन ०२ पिस्टल व ०२ जिवंत काडतुस जप्त करुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे. तसेच पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीतील सराईत गुन्हेगार–

१) गणेश कांबळे ऊर्फ मॅड गण्या वय २३ वर्षे रा. निराधार नगर, पिंपरी पुणे २) ऋषीकेश ऊर्फ शेऱ्या राजु आडागळे वय २४ वर्षे रा. पद्मावती मंदिराचे मागे, उर्से ता.मावळ जि.पुणे ३) बाबा सैफन शेख वय २७ वर्षे रा. गल्ली नं ४, राजीवगांधी नगर, पिंपळे गुरव, पुणे ४) राहुल ऊर्फ सोन्या प्रकाश ढगे वय २५ वर्षे रा. पारखे वस्ती, सुसगांव ता. मुळशी जि. पुणे५) प्रताप ऊर्फ बाळु हनुमंत पवार वय ३२ वर्षे सध्या रा. गणेश नगर, पिरंगुट, मुळशी जि. पुणे

---

# हजरत महंमद पैगंबर जयंतीची शासकीय सुट्टी ८ सप्टेंबरला जाहीर करा

**पुणे । प्रतिनिधी**

**सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षीही हजरत महंमद पैगंबर यांची जयंती जगभराप्रमाणे पुणे शहरांमध्ये देखील मोठ्या उत्साहाने मुस्लिम समाजबांधवांच्या वतीने साजरी करण्यात येणार आहे. यंदाची वर्ष हे १५०० वे जयंती वर्ष असल्यामुळे यावर्षी अधिक उत्साहाने व धार्मिक प्रथा परंपरांचे पालन करून साजरी केली जाणार आहे.**

यंदाची जयंती ही ५ सप्टेंबरला गणेश विसर्जनाच्या पूर्वदिनी येत असल्यामुळे धार्मिक सलोखा जपत यापूर्वीच ही जयंती सोमवार दिनांक ८ सप्टेंबरला साजरी करण्याबाबतचा निर्णय सिरत कमिटीच्या वतीने मुस्लिम समाजाच्या तर्फे घेण्यात आला आहे. मुस्लिम समाजाच्या या निर्णयाचे राज्य शासन व सर्व स्तरावर कौतुक करण्यात आले होते.

पैगंबार जयंतीच्या अनुषंगाने आज मुस्लिम समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये उपस्थित शासकीय, निमशासकीय प्रतिनिधींच्या वतीने उत्सवांमध्ये अधिक सहभाग दर्शविण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासनाच्या वतीने दरवर्षी हजरत महंमद पैगंबर जयंती दिवशी देण्यात येणारी शासकीय सुट्टी ८ सप्टेंबर रोजी देण्यात यावी अशी मागणी सिरत कमिटीच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पुणे जिल्हाधिकारी डॉ जितेंद्र डुड्डी यांच्याकडे करण्यात आली आहे.मौलाना जमिरुद्दीन, मौलाना निझामुद्दीन, रफिउद्दीन शेख, सिराज बागवान, आतिक खान उस्ताद, आसिफ शेख, नदीम मुजावर, जावेद खान, जावेद शेख, गुलाम अहमद कादरी आदी मान्यवरांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेवुन निवेदन सादर केले. राज्य सरकारने मुंबई आणि उपनगर साठी ८ सप्टेंबर रोजी सुट्टी असेल असे जाहीर केले आहे, तसेच आमच्या मागणीचा सकारात्मक विचार करून पुणे शहरात सुद्धा ८ सप्टेंबरला शासकीय सुट्टी जाहीर करेल असा विश्वास सिरत कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

---

# 'श्री तुळशीबाग महागणपती'ची मयूर रथातून सांगता मिरवणूक

पुणे । प्रतिनिधी

मानाचा चौथा श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट च्या १२५ व्या वर्षीच्या गणेशोत्सवाची सांगता वैभवशाली सांगता मिरवणुकीने होणार आहे. तुळशीबाग महागणपतीची सांगता मिरवणूक मयूर रथातून निघणार आहे.



मयूर रथावर फुलांची आकर्षक सजावट करण्यात येणार असून हा रथामध्ये हायड्रोलीक पद्धतीचा वापर केला जाणारा आहे. रथाची उंची ३५ फूट इतकी असून हा रथ १६ फूट रुंद आणि २४ फूट लांब असणार आहे.

मंडळाच्या १२५ व्या वर्षानिमित्त महिला व परिसरातील व्यापारी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. मिरवणुकीच्या अग्रभागी लोणकर बंधू यांचा नगारा असून ढोल ताशा पथके देखील सहभागी होणार आहेत. किती पथके लावणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे.

---

# बिबट प्रवण भागातील हिवरे पंचक्रोशीतील शेतीपंपाना आता दिवसा वीजपुरवठा

ओझर । प्रतिनिधी

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' अंतर्गत तेजेवाडी येथील १२ एकर गायरानावर उभारलेल्या ४ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचा बुधवारी (दि.३) महावितरणचे संचालक (मानव संसाधन) यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

त्यामुळे जुन्नर तालुक्यातील बिबट प्रवण क्षेत्रातील हिवरे बु. सह पंचक्रोशीमधील दहा गावांतील शेतीपंपाना आता दिवसा वीज पुरवठा सुरु झाला असून, येथील शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी यापुढे रात्री–अपरात्री शेतीमध्ये जाण्याची गरज भासणार नाही.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' हाती घेतली आहे. या योजनेतून राज्यात १६ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प राज्यात होत असून, त्यातून तयार झालेली वीज शेतकऱ्यांना दिवसा दिली जात आहे.या योजनेतूनच जुन्नर तालुक्यातील हिवरे बु. ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रांतर्गत ५ किमी परिघातील तेजेवाडी येथे १२ एकर गायरान जमिनीवर ४ मेगावॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारण्यात आला आहे. या सौर प्रकल्पात तयार झालेली वीज हिवरे बु. उपकेंद्राला जोडून त्यांतर्गत येणाऱ्या १० गावांना आता दिवसा विजेचा लाभ मिळणार आहे. बुधवारी (दि. ३) महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते या प्रकल्पाचा शुभारंभ झाला.

यावेळी महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल काकडे अधीक्षक अभियंते युवराज जरग, अनिल घोगरे व संजीव नेहते, कार्यकारी अभियंते राहूल गवारे, केशव काळुमाळी, धनंजय अहेर व प्रवीण पंचमुख, तेजेवाडीचे सरपंच संपत सखाराम नायकोडी व उपसरपंच राजू विश्वासराव यांचेसह महावितरणचे अधिकारी, कर्मचारी तसेच मे. आवाडा कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

या सौर प्रकल्पामुळे बिबट प्रवण क्षेत्र असलेल्या जुन्नर तालुक्यातील तेजेवाडी, ओझर, हिवरे बु., हिवरे खु., शिरोली खु.,शिरोली बु., कुरण, ढोळवाडी, भोरवाडी आदी १० गावांतील २ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे.